दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२२३ | गुरूवार, दि.०५ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सोशल मीडियाला वेसण!

'लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा। ऐरावत रत्न थोर, त्यासी अंकुशाचा मार।। जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण।।' या अभंगात संत तुकाराम महाराजांनी लहानपणाची थोरवी वर्णिली आहे. अंगात मोठेपण आले की त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. यासाठी कोणतेही दायित्व नसलेले लहानपणच बरे हे त्याकाळी तुकाराम महाराजांनी सांगितले असले तरी वर्तमानात लहानपणच अधिक यातनादायी झाले आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा १४ नोव्हेंबर हा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो. बालकांच्या हक्काचा वर्षातील हा एकमेव दिवस असला तरी आज लहान मुलांची स्थिती पाहिल्यास त्यांचे बालपण कुठेतरी हरवत चालल्याचे दिसून येते.

## आसाममध्ये गोमांस बंदीबाबत मोठा निर्णय

दिसपुर–आसाममध्ये बीफवर बंदी घालण्यात आली आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी पत्रकार परिषद घेत याची घोषणा केलीये. आसामच्या मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला. ज्यामध्ये राज्यातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि सार्वजनिक ठिकाणी गोमांसवर बंदी घातली गेली आहे. गोमांस बंदीच्या या निर्णयानंतर आसामचे मंत्री पियुष हजारिका यांनी म्हटले की, मी आसाम काँग्रेसला आव्हान देतो की त्यांनी गोमांस बंदीचे स्वागत करावे नाहीतर पाकिस्तानात जाऊन स्थायिक व्हावे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी म्हटले होते की, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष भूपेन कुमार बोरा यांनी त्यांना पत्र लिहून मागणी केल्यास ते आसाममध्ये गोमांस बंदी करण्यास तयार आहेत.

# लाल कांद्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी

## क्विंटल मागे मोठी घसरण, काय मिळाला भाव?

**नाशिक । प्रतिनिधी**

**एकीकडे श्रीलंका सरकारने आयात शुल्कात मोठी कपात केल्यामुळे त्याचा फायदा होऊन कांद्याच्या भावात वाढ होईल अशी अपेक्षा शेतकरी बाळगून होते. मात्र कांदा दरात सुधारणा होण्या ऐवजी घसरण सुरु झाल्याचे पाहायला मिळाले आहे. परिणामी, लासलगाव, मनमाड, नांदगाव आदी बाजार समित्यांमध्ये लाल कांद्याच्या सरासरी दरात प्रति क्विंटल ८०० ते १००० रुपयांची घसरण झाली आहे.**

गेल्या आठवड्यात लाल कांद्याला प्रति क्विंटल ४ हजार ३०० रुपये भाव मिळाला होता. आज त्याचं कांद्याला सरासरी ३ हजार ५०० रुपये भाव मिळाला आहे. कांदा दरात मोठी घसरण झाल्याने कांदा उत्पादक शेतकरी पुरता हवालदिल झाले असून लाल कांद्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी येण्याची वेळ आली आहे. एकीकडे ढगाळ हवामानामुळे लागवड केलेल्या कांद्यावर करपा आणि बुरशीजन्य रोग लागत असतांना त्यावर महागडी औषधे मारावी लागत आहे. तर



दुसरीकडे कांद्याच्या दरात घसरण झाल्याने शेतकरी दोन्ही बाजूने होरपळला जात आहे. दुसरीकडे, तामिळनाडूतील फेंगल चक्रीवादळाच्या भीतीने सोलापुरात कांद्याची आवक वाढली आहे. सोलापूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील दोन दिवसात जवळपास ८५० ट्रक कांद्याची आवक झाली आहे. चक्रीवादळामुळे पावसाची भिती असल्याने अनेक शेतकऱ्यांनी कच्चा कांदा बाजारात आणला आहे. दरम्यान, कांद्याची आवक जास्त आणि कच्चा कांदा असल्याने बाजारात कांद्याचे दर घसरले आहेत. सर्वसाधारण कांद्याला प्रतिक्विंटल दोन हजार ते तीन हजार रुपये भाव मिळतो आहे. तर उच्च प्रतीच्या कांद्याला प्रतिक्विंटल चार हजार ते पाच हजार रुपयांपर्यंत भाव मिळतो आहे.

**मागील आठवड्यात लाल कांदा भाव**
कमीत कमी – १५०० रू
जास्तीत जास्त – ५५०० रू
सरासरी –४३०० रू

**आजचे लाल कांदा भाव**
कमीत कमी– १००० रू
जास्तीत जास्त – ५१०१रू
सरासरी – ३५०० रू
काय भाव मिळाला?

## गुगलवर सर्वाधिक गाजला हा अनपेक्षित शब्द

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

एखादा नवा शब्द, एखाद कलाकृती, एखादी संकल्पना या आणि अशा कैक प्रश्नांची उत्तरं गुगलकडे शोधली जातात. आपल्याला जी माहिती नाही, ती मिळवण्यासाठी अनेकजण सर्रास या गुगलचीच मदत घेतात. दरवर्षी, दर दिवशी आणि दर क्षणाला गुगलवर कोण ना कोण, काही ना काही शोधत असते अर्थात सर्च करत असते. दरवर्षी असा एखादा शब्द असतो, जो सातत्यानं आणि सर्वाधिक वेळा गुगलवर सर्च होतो. याच यादीत आता आणखी एका शब्दाची भर पडली आहे. २०२४ मध्ये हाच शब्द सर्वाधिक गाजला असून, ब्रिटनच्या ऑक्सफर्ड युनिवर्सिटीने त्याची उकल केली आहे. वर्ड ऑफ द इयरची घोषणा ◀◀ पान २ वर

## कान्हाच्या नगरीत वातावरण तणावपूर्ण

मथुरा : उत्तर प्रदेशातील मथुरामधून एक विचित्र आणि धार्मिक भावनांना दुखवणारं प्रकरण समोर आलंय. भगवान श्रीकृष्णाची जात जाट असल्याचं कान्हा नगरीत सर्व भिंतीवर लिहिले आहे. कुमार साहेब सिंह नावाच्या व्यक्तीने घराच्या भिंतींवर श्रीकृष्णाबद्दल अशा गोष्टी लिहिल्या होत्या. यावरून बराच गदारोळ झाला होता. स्थानिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुमार साहेब सिंह नावाच्या व्यक्तीने नांद गावातील घरांच्या भिंतींवर श्रीकृष्णाशी संबंधित काही वादग्रस्त गोष्टी लिहून ठेवल्या होत्या. ज्यामध्ये तो जाट जातीचा असल्याचे वर्णन करण्यात आले होते. तेव्हापासून नांद गावात वाद पसरला आणि प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत या व्यक्तीविरुद्ध एफआयआर नोंदवला आणि भिंतींवर लिहिलेल्या कमेंट्स काढून टाकल्या. नांदगाव आणि बरसाणा परिसरातील या घटनेनंतर तणावपूर्ण वातावरण आहे. कारण या भागात राधा आणि कृष्णाच्या भक्तिला खूप महत्त्व आहे. या ठिकाणी राहणारी लोक याला आपला धार्मिक वारसा मानतात. असे असतानाही कुमार साहेब सिंह यांनी नांदगावचा इतिहास भिंतींवर लिहिला. ज्यामध्ये श्रीकृष्णाला जाट कुळाशी जोडले गेले होते. याला खोटे आणि फुटीरतावादी म्हणत, एका स्थानिक रहिवाशाने असा आरोप केला की अशा प्रकारचे वक्तव्य जातीय द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत.

# अखेर ठरले: देवेंद्र अध्याय ३.० आजपासून सुरु

## आझाद मैदानावर सायं. ५.३० वा. मुख्यमंत्री म्हणून फडणवीसांचा शपथविधी; दोन उपमुख्यमंत्रीही घेणार शपथ

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानसभेचा निकाल लागून १० दिवस उलटले तरी महाराष्ट्रात नविन सरकार अस्तित्वात येत नव्हते. मुख्यमंत्री कोण होणार ? यावरुन बरेच महाभारत झाल्याचे संपुर्ण राज्याने पाहिले. सुरुवातीपासून देवेंद्र फडणवीस यांचे नाव आघाडीवर होते. मात्र त्यांना सुध्दा मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला. अखेर दि. ४ डिसेंबर रोजी भाजप विधीमंडळ पक्षाच्या गटनेते पदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याने महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. दि. ५ डिसेंबर रोजी आझाद मैदानावर हा शपथविधी सोहळा होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह १९ राज्यातील दिग्गज नेते उपस्थित राहणार आहेत. या शपथविधीच्या माध्यमातून राज्यात पुन्हा एकदा देवेंद्र अध्याय ३.० सुरु होणार असून १.० पेक्षा फडणवीस यांचा हा कार्यकाळ चांगला राहणार असल्याचे म्हटले जात आहे.**

राज्यात विधान सभा निवडणुका पार पडल्या असून महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. १३२ जागा मिळाल्याने राज्यात भाजपच सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. बहुमत असून सुध्दा १० दिवसापर्यंत महायुतीला राज्याचा मुख्यमंत्री कोण होईल हे ठरवता आले नव्हते. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज होते, अशा चर्चा होत्या. ते त्यांच्या दरे या मुळ गावी सुध्दा गेले होते. त्यानंतर शिंदे यांना गृहमंत्री, नगरविकास आणि अर्थ खाते हवे असल्याचे सुध्दा बोलले गेले. शेवटी सर्वच वादावर पडदा पडला असून गिरीष महाजन–एकनाथ शिंदे भेट, फडणवीस– शिंदे भेट या सह काही भेटी झाल्यानंतर राजकीय परिस्थिती निवळली. शिंदे यांची नाराजी दुर करण्यात फडणवीस यांना यश आले. शिंदेसेना आणि अजित पवार गटाने आपल्या ◀◀ पान २ वर

### शपथविधी सोहळ्याची जय्यत तयारी

नव्या सरकारचा शपथविधी सोहळा गुरुवारी होणार आहे. मुंबईच्या आझाद मैदानात या शपथविधी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी लाडक्या बहिणींना विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार तब्बल चाळीस हजार लोक या सोहळ्यासाठी उपस्थित असणार आहेत. तसेच या सोहळ्याची जय्यत तयारी देखील करण्यात आली आहे.



### निमंत्रण पत्रिकेवर एकाचेच नाव

देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी सोहळ्याच्या पत्रिकेमध्ये फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव आहे. आग्रहाचे निमंत्रण, विश्वगौरव मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री म्हणून श्री देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी सोहळा आणि सन्मानीय उपमुख्यमंत्री तथा मंत्रिमंडळाच्या शपथविधी सोहळ्याला आपण उपस्थित रहावं ही अग्रहपूर्वक विनंती. भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश असा मजकूर या निमंत्रण पत्रिकेवर छापण्यात आला आहे.



### फडणवीसांनी शपथ घेण्यापूर्वीच जरांगे पाटलांनी ठरवले



देवेंद्र फडणवीस हे गुरूवारी तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या आहेत, सोबतच इशारा देखील दिला आहे. सरकार स्थापन झाल्यानंतर आपण सामूहिक आमरण उपोषण करणार असून, मरेपर्यंत हे आंदोलन सुरू राहील हीच आंदोलनाची पुढची दिशा असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

### फडणवीसांनी माझे नाव सुचवले–शिंदे



एकनाथ शिंदे यांना तुम्ही देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात सहभागी होणार आहात का? असा सवाल पत्रकार परिषदेत करण्यात आला. त्यावर ते म्हणाले, अरे बाबा, तुम्हाला संध्याकाळी सांगतो ते. तुम्हाला तर एकदमच पाहिजे सगळं. देवेंद्र फडणवीस माझ्याकडे आले. त्यांचा मनाचा मोठेपणा आहे. मी त्यांना धन्यवाद देतो. अडीच वर्षापूर्वी इथेच देवेंद्रजींनी मी मुख्यमंत्री व्हावं म्हणून माझ्या नावाची शिफरस केली होती. आज देवेंद्रजी मुख्यमंत्री व्हावेत अशी शिफारस आणि समर्थनाचे पत्र दिले आहे, असे म्हणत त्यांनी किस्सा सांगितला.

### २२ राज्याचे मुख्यमंत्री येणार

या शपथविधी सोहळ्याला तब्बल २२ राज्यातील मुख्यमंत्री देखील हजर राहणार आहेत. यासह बॉलीवुड, उद्योग क्षेत्रातील नामवंत देखील उपस्थित राहणार आहेत.

### मंत्रीपदाबाबत पंकजा मुंडे स्पष्टच बोलल्या



पंकजा मुंडे यांना पत्रकारांनी आपली मंत्रिपदी वर्णी लागेल का? असा सवाल केला असता त्या म्हणाल्या, 'यावर भाष्य करणे हे मला गरजेचे वाटत नाही. त्यावर भाजपचे वरिष्ठ नेते आणि भाजपची टीम ठरवेल, असे त्या म्हणाल्या.

### महायुतीच्या नेत्यांनी राज्यपालांची घेतली भेट

महायुतीच्या नेत्यांनी राजभवनात जावून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली. यावेळी भाजपचे गटनेते देवेंद्र फडणवीस, शिवसेनेचे गटनेते एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते अजित पवार यांनी एकत्रितपणे सरकार स्थापनेचा दावा केला. यानंतर तिन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

### शिंदेंनी काढला पहाटेच्या शपथविधीचा विषय


अजित पवार यांनी मात्र आपण सरकारमध्ये सामील होणार असल्याचे जाहीर करुन टाकले आहे. यावर बोलताना एकनाथ शिंदे यांनी अजित पवारांना पहाटेच्या शपथविधीची आठवण करुन दिली. एकनाथ शिंदे म्हणाले, अरे दादांना तर अनुभव आहे दुपारीही घेण्याचा आणि सकाळीही घेण्याचा. यानंतर पत्रकार परिषदेत एकच हशा पिकला.

## दिल्लीवारीबद्दल अजित पवारांचा मोठा खुलासा

**मुंबई । वृतसंस्था**

**राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा केल्यानंतर महायुतीच्या तिन्ही नेत्यांची पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेत अजित पवार यांनी दिल्लीवारीबद्दलचा खुलासा केला आहे. अमित शहांकडे अजित पवार यांनी राज्यात मंत्रीपदे, केंद्रात मंत्रीपदे आणि एक राज्यपालपद मागितले होते. या मागण्या घेऊन ते दिल्लीला गेले होते. आता अजित दादांनीच अमित शहांच्या भेटीबाबत सांगितले आहे.**

महायुतीच्या सत्तास्थापनेला गेल्या काही दिवसांपासून विलंब होत असल्याने महायुतीत काही आलबेल नाही अशी चर्चा रंगली होती.





एकनाथ शिंदे यांची तब्येत खराब असल्याने ते आराम करत होते. तर अजित पवार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीसाठी दिल्लीत दोन दिवस मुक्काम केला होता. आपल्या पदरात जास्त आणि महत्त्वाची खाती ◀◀ पान २ वर

## विकासकामांच्या वचनपूर्तीसाठी कटिबद्ध राहू–डॉ.योगेश क्षीरसागर

### बीडमध्ये संत सावता महाराज मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन

**बीड । प्रतिनिधी**

**नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आपण विकासाचे व्हिजन मांडले होते. महायुती सरकारच्या माध्यमातून आपण विकासकामांच्या वचनपूर्तीसाठी कटिबद्ध राहणार आहे, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. बीडमध्ये संत सावता महाराज मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन बुधवारी (दि.४) करण्यात आले.**



यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ नागरिक नामदेवराव दुधाळ, माजी नगरसेवक बाबूराव दुधाळ, नितीन साखरे, शुभम धूत, बिभीषण लांडगे, मोहनराव गोरे, प्रा.लक्ष्मण गुंजाळ, रमेश दुधाळ, राजेंद्र शेलकर, राजेश साळुंके, गोरख यादव, संतराम पानखेडे, दिलीप बेदरे, मयुर आखाडे, मनोज काळे, निलेश घाडगे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, शहरातील सावता माळी चौक परिसरातील बिंदूसरा नदीकाठेला संत सावता महाराजांचे ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०४ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६.५० क्विंटल | २,५२१ | २,६९० | २,६०५ |
| ज्वारी/हायब्रिड: ३२.०० क्विंटल | २,०६१ | २,६६१ | २,३१६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २२.०० क्विंटल | ६,२०१ | ६,८५० | ७,५०० |
| उडीद : ४०.५० क्विंटल | ५,७०० | ७,१०१ | ६,४५३ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,४११ | ३,१०१ | २,७४१ |
| मुग : १.५० क्विंटल | ६,९५१ | ७,१३० | ७,०४० |
| सोयाबीन: १०९.०० क्विंटल | ४,००० | ४,२७५ | ४,१६० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,४०१ | ६,८०१ | ५,४०१ |


# गेटवे ऑफ इंडियाला १०० वर्ष पूर्ण!

## कमानी मुस्लिम शैलीच्या तर सजावट हिंदू शैलीनुसार, बांधकामाचा इंटरेस्टिंग इतिहास

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेटवे ऑफ इंडिया... फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात लोकप्रिय असलेली वास्तू. मुंबईत येणारा प्रत्येक वक्ती मग तो भारतीय असो की परदेशी प्रत्येकालाच गेटवे ऑफ इंडिया पाहण्याची इच्छा असते. मुंबईच्या अरबी समुद्राजवळ असलेले गेटवे ऑफ इंडिया हे भारताचे प्रवेश द्वार म्हणून ओळखले जाते. गेटवे ऑफ इंडिया या वास्तूला ४ डिसेंबर २०२४ रोजी बरोबर १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. गेटवे ऑफ इंडियाच्या कमानी मुस्लिम शैलीच्या तर सजावट हिंदू शैलीनुसार आहेत. गेटवे ऑफ इंडिया या वास्तूच्या बांधकामाचा इतिहास खूपच इंटरेस्टिंग आहे.**

मुंबईतल्या अपोलो बंदराच्या समुद्र किनाऱ्यावर दिमाखात उभी असलेली वास्तू म्हणजे गेटवे ऑफ इंडिया. ही भव्य दिव्य वास्तू पाहून सगळेच जण अचंबित होतात. १६ व्या शतकात उभारण्यात आलेल्या गेटवे ऑफ इंडिया या वास्तूने १०० वर्षात अनेक संकटे पाहिली आहेत. ब्रिटीश राजवटीत बांधण्यात आलेल्या गेटवे ऑफ इंडिया ही वास्तू २६/११ सारख्या ◀◀ पान २ वर



## अग्रलेख

# सोशल मीडियाला वेसण!

'लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा। ऐरावत रत्न थोर, त्यासी अंकुशाचा मार।। जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण।।' या अभंगात संत तुकाराम महाराजांनी लहानपणाची थोरवी वर्णिली आहे. अंगात मोठेपण आले की त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. यासाठी कोणतेही दायित्व नसलेले लहानपणच बरे हे त्याकाळी तुकाराम महाराजांनी सांगितले असले तरी वर्तमानात लहानपणच अधिक यातनादायी झाले आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा १४ नोव्हेंबर हा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो. बालकांच्या हक्काचा वर्षातील हा एकमेव दिवस असला तरी आज लहान मुलांची स्थिती पाहिल्यास त्यांचे बालपण कुठेतरी हरवत चालल्याचे दिसून येते. लहान मुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे म्हटले जाते.

मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या संधी मिळाल्या पाहिजेत असे पंडित नेहरू यांचे मत होते. विज्ञानाने जग प्रगत झाले आहे. मात्र, याच विज्ञानाने लाभलेल्या मोबाईल, इंटरनेट, व्हीडीओ गेम, केबल टीव्ही यासारख्या साधनांनी मुलांच्या प्रगतीला खीळ घातली आहे, त्यांना वेगळ्याच जगात नेले आहे असे म्हणायची वेळ आली आहे. मित्रांसोबत मैदानी खेळ खेळण्याच्या, पालकांशी गप्पा मारून आपले विचार प्रकट करण्याच्या वयात मुले मोबाईलच्या आभासी जगामध्ये रमताना दिसत आहेत. त्यामुळे बालवयातच मुलांना नेत्रविकार, मनोविकार जडू लागले आहेत. देशासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष हे आजच्या मुलांचे आदर्श नसून कार्टून जगतातील खोटी पात्रे मुलांना आपले आदर्श वाटू लागले आहेत. मुलांचे भवितव्य घडवण्याच्या हेतूने नोकरी-व्यवसायासाठी बाहेर पडणारे आई-बाबा मुलांना उमलत्या वयातच वेळ देत नसल्याने मुलांना त्यांच्याविषयी प्रेम आणि आपुलकीच राहिली नाही.

पर्यायाने पालकांकडून मुलांना संस्कारच मिळत नाहीत. संस्कारच नसल्याने हल्लीची मुले पालकांना, मोठ्या व्यक्तींना सर्रास उलट उत्तर देताना, उद्धटपणे वागताना थोडासा सुद्धा विचार करत नाहीत. व्हीडीओ गेम्स, रील्स पाहून लहान मुले मनोविकाराने ग्रासली जात आहेत. मोबाईलमुळे जग मुठीत आले आहे हे खरे असले तरी बालवयातच मुलांना अनैतिक गोष्टींचे शिक्षण मिळत आहे. मोबाईलमुळे मुलांना नको त्या गोष्टींचे शिक्षण मिळत आहे. गत काही वर्षांत लहान मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही कमालीची वाढ झाली आहे. या सा-यांचा परिपाक म्हणून बालगुन्हेगारीचा आलेखही दिवसागणिक वाढत चालला आहे. लहान मुले जरा काही मनाविरुद्ध घडले, घरात कोणी बोलले, अपमान केला, परीक्षेत कमी गुण मिळाले की आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ लागले आहेत. आज बालमजूर प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी कितीतरी किराणा मालाच्या दुकानात, चहाच्या टपरीवर, हॉटेल्समध्ये, छोट्या कारखान्यात लहान मुले काम करताना दिसतात. मोठ्या शहरात तर लहान मुलांकडून भीक मागून घेणे हा व्यवसाय बनला आहे.

हे सारे पाहिल्यानंतर मुलांचे हरवत चाललेले बालपण प्रकर्षाने लक्षात येते आणि प्रश्न पडतो की, हरवत चाललेले बालपण त्यांना पुन्हा मिळवून देण्याचे दायित्व नक्की कोणाचे? पालकांचे, समाजाचे की सरकारचे? मुलांच्या हातात मोबाईल द्यायचा की नाही हा आज मोठा गंभीर प्रश्न बनला आहे. हा केवळ भारतापुरता मर्यादित प्रश्न नाही तर तो सा-या जगाला भेडसावतो आहे. त्या अनुषंगाने ऑस्ट्रेलियाने पहिले पाऊल उचलले आहे. ऑस्ट्रेलियात १६ वर्षांखालील मुलांना समाजमाध्यमे वापरण्यावर बंदी घालणारा कायदा गुरुवारी मंजूर करण्यात आला. हा कायदा फेसबुक, इन्स्टाग्रामपासून स्नॅपचॅटसारख्या सर्व समाजमाध्यमांना लागू आहे. हा कायदा मोडणा-या कंपन्यांना ३२ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतक्या दंडाची तरतूद नव्या कायद्यात करण्यात आली आहे. आतापर्यंत अनियंत्रित समाजमाध्यमांमुळे लहान मुलांवर होणा-या दुष्परिणामांची जगभरात केवळ चर्चा होत होती.फ्रान्ससह अमेरिकेतील काही राज्यांमध्ये पालकांच्या परवानगीने समाजमाध्यमात खाती उघडण्याची मुलांना परवानगी आहे.

ऑस्ट्रेलियाने गुरुवारी केलेला कायदा हा सर्वांत कडक असून तो अनेक देशांसाठी मार्गदर्शक ठरू शकेल असे मानले जात आहे. ऑस्ट्रेलियाच्या सेनेटमध्ये 'समाजमाध्यम किमान वयोमर्यादा विधेयक' ३४ विरुद्ध १९ मतांनी मंजूर करण्यात आले. कनिष्ठ सभागृहात (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह) बुधवारी १०२ विरुद्ध १३ अशा मताधिक्याने या विधेकावर मान्यतेची मोहर उठवण्यात आली होती. नव्या कायद्यानुसार १६ वर्षांखालील मुलांना टिकटॉक, फेसबुक, स्नॅपचॅट, रेडिट, एक्स(ट्विटर) आणि इन्स्टाग्रामच्या समाजमाध्यमांवर खाती उघडण्यास बंदी असेल. याची अंमलबजावणी करण्यासाठी कंपन्यांना एक वर्षाचा कालावधी देण्यात आला असून त्यानंतर मात्र कंपन्यांना मोठ्या रकमेचा दंड भरावा लागेल. नव्या कायद्याबाबत ऑस्ट्रेलियात मतमतांतरे आहेत. बालहक्क संघटनांनी कायद्याला विरोध केला असला तरी पालकांकडून मात्र नव्या कठोर नियमांचे स्वागत केले जात आहे.

भारतातही मीडियावर बंदी घालणा-या कायद्याची गरज आहे. समाजमाध्यमांच्या अति वापरामुळे मुलांचे केवळ मानसिक आरोग्यच नाही तर शारीरिक आरोग्यही धोक्यात आले आहे. कोवळ्या वयातच त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होण्याची वेळ आली आहे. अजाणत्या वयात समाजमाध्यमातील चौफेर भडिमारामुळे अनेक अनैतिक गोष्टींचे ज्ञान त्यांना मिळू लागले आहे. त्यामुळे त्यांचे भावविश्वच कोलमडून जात आहे. मुलांचे मानसिक स्वास्थ्य बिघडल्याने त्यांची मैदानी खेळांची आवड कमी होत चालली आहे. आपल्या देशाने विविध तंत्रज्ञानामध्ये साधलेली प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यामुळे माणसाचे चंद्रावर जाण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकेल परंतु काही विघ्नसंतोषी लोक या तंत्रज्ञानाचा गैरवापर करण्याचीही भीती आहे. सोशल मीडियाची स्थितीही तशीच झाली आहे. या माध्यमातून प्रचंड ज्ञान मिळू शकते परंतु त्याच्या गैरवापराचेही धोके आहेत.

## केंद्रीय मुख्याध्यापक बिनवडे सरांच्या मुलाची एमबीबीएस साठी निवड

पाटोदा । प्रतिनिधी



पाटोदा तालुक्यातील केंद्रिय मुख्याध्यापक या पदावर कार्यरत असलेले उपक्रमशील शिक्षक व प्रभारी केंद्रप्रमुख श्री बिनवडे विठ्ठल रामकृष्ण तालुका पाटोदा जिल्हा बीड यांचा मुलगा डॉ. प्रदीप कुमार विठ्ठल बिनवडे एमबीबीएस याचा नीट पीजी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये ऑल इंडिया रँक ७९२० आला व मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया तसेच महाराष्ट्र राज्य आरोग्य विद्यापीठ नाशिक द्वारे प्रथम निवड यादीतच डॉ प्रदीप कुमार विठ्ठल बिनवडे एमबीबीएस याचा नंबर डॉ. बीकेवालावलकर ग्रामीण मेडिकल कॉलेज चिपळूण सावर्डे या ठिकाणी लागला व दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी प्रवेश घेण्यात आला.बिनवडे सर यांची मुलगी डॉ बिनवडे प्रगती हि एमबीबीएस , एमडी अनस्थेशिया भुलतज्ञ या अभ्यासक्रमासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर या ठिकाणी नोव्हेंबर २०२२ पासून प्रशिक्षण घेत आहे, तसेच लवकरच ती अंतिम वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करुन रुग्णसेवेत उपलब्ध होईल . बिनवडे सर हे एका सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले असुन त्यांनी व त्यांच्या पत्नीने खडतर परिस्थितीतुन व अपार कष्ट घेऊन दोंन्ही मुलांना उच्चशिक्षित केले आहे.त्याचप्रमाणे बिनवडे सर त्यांच्या पत्नी हे दोघेही दांपत्य शासन सेवा प्रामाणिकपणे करत आहेत . आपल्या दोंन्ही मुलांना उच्चशिक्षित केल्यामुळे तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांना व पालकांना आदर्श घ्यावा अशा प्रकारचे बिनवडे कुटुंबांचा आदर्श आज समाजापुढे निर्माण झाला आहे.घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो हे शिक्षण रुपी दुध पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. याच उक्तीप्रमाणे बिनवडे सरांनी आपल्या मुलांवर योग्य संस्कार करून त्यांना उच्चशिक्षित केले यामागे त्यांची पत्नी व सर यांचे फार मोठे परिश्रम आहेत याचा समाजाने आदर्श घेऊन आपल्या मुलांवर योग्य ते संस्कार शिक्षणासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपली मुले उच्चशिक्षित होण्यासाठी प्रयत्न करावेत हा संदेश ऐश्वर्या संपन्न संत भगवान बाबा यांनी म्हटल्याप्रमाणे शेतीविका व मुलांना शिकवा या ब्रीदवाक्यप्रमाने सरांनी आपल्या मुलांवर योग्य संस्कार करून उच्चशिक्षित केले व पाटोदा तालुक्याची मान उंचावली.

# 'लाच' विकासाचा अडसर

**मी हे फक्त भ्रष्टाचार करणारे लोकांना बद्दल लिहिले आहे जे लाच देतात आणि घेतात. बाकी कोणी मनावर घेऊ नका. अविकसनशील शहरात माझी अवस्था.बिडकर कामा साठी लाच देतो आणि निर्लज्ज पणे लाच घेणारे अधिकारी ती लाच घेतात.मग कधी सुधारणा होणार माझ्या बीड मध्ये. हेच चक्र चालू आहे. तुम्ही लोक प्रत्येक गोष्टी साठी लाच देतात. अरे बाबा पण तुझ्या मुळे खूप मोठ्या भ्रष्टाचाराचे जाळे पसरले आहे. इथे खरं तर विषय कोठून चालू करायचा आणि कोठे थांबवायचा. हाच प्रश्न आहे. पण रोज थोडं थोडं बोलूंयात कारण विषय खूप मोठा आहे. लाच घेणारा प्रत्येक अधिकारी, कर्मचारी ते लाच घेणाऱ्या शिपाई पर्यंत कोठे कोठे पैसे देतात लोकांनो. थोडी तरी लाज बाळगा. आपले काम होण्यासाठी आपण किती भ्रष्टाचार करतो.**

अधिकाऱ्यांना पगार असतो.तरीही पोटभरून तुम्ही दिलेले पैसे पोटाच्या बाहेर येतात. प्रत्येक भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांनी तर लाज थोडी सुद्धा ठेवली नाही. त्यांनी त्यांचा इमान वेशीला टांगून मगच येतात ऑफिस मध्ये. इथे आपण काही बाबितच बोलू नंतर काही बोलू कारण तेच विषय मोठा आहे. खरे तर या विकाशित असलेल्या या देशात बीड सारखे शहर आज दोन हजार २४ मध्ये हि आपले बीड आहे तसेच आहे. विकसित होणे हि बाबच बीडला माहित नाही, जग एकीकडे चालत आहे आणि आपण वर्षानुवर्षे तिथेच.तीच परिस्थिती कायम राहते. माझ्या लहानपणी जसे बीड होते तसेच आहे .आज हि कायम यात फक्त एकच घडले कि बीड खूप पसरत आहे क्षेत्रफळात वाढले. नवनवीन कॉलनी वाढल्या. बीड दूरवर पसरले आहे. पण बीड आजतायगत तसेच आहे.बीड मधील प्रश्न तेच आहे.माझ्या आईच्या लहानपणी पण तसेच होते म्हणजे ६० ते ७० वर्षांपासून कायम बिडकर त्याच समस्या मध्ये वावरत आहेत. त्याच समस्या, तेच कायम मूलभूत प्रश्न, तोच भ्रष्टाचार, तेच राजकारण आणि त्याच

राजकारणा तून होणारे समाजकारण. तीच सर्व परिस्थिती आणि विशेष करून तीच जनता, तेच लोक बुरसटलेले, कशाची हि खंत वाटत नाही बिडकरानां. तोच मरगळले पणा तिसरी पिढी आली तरी तेही तसेच कायम. मला खरं तर बिडकरांना विचारायचे कि तुम्हाला कशाचाच फरक पडत नाही का, किती शोषिक आहात तुम्ही लोक. या रोजच्या तरी प्रश्नाला सामोरे जा पाणी आणि वीज, रस्ते. याही समस्या ला मूग गिळून शांतच बसायचं आहे, मला वाटते कि या घाणीतले डास चावून चावून तुमचं रक्त सळसळत नाही. तुमच्या रक्तातील

बाणेदार पणा शिल्कक नाही. उठा जागे व्हा अस म्हणणे देखील चूक आहे तुमच्या समोर कारण झोपलेल्या माणसाला जागे व्हा म्हणतो पण मेलेल्या जीवाला जागे व्हा कसे म्हणायचं. अशीच गत तुमची झाली आहे. मेलेल्या माणसालाच काही लागत नाही जसे की तुम्ही पाणी १५ दिवस आले तरी तुम्ही शांत असतात, आपल्या भर सणात लाईट नसते तरी तुम्ही शांत असता, तुमच्या घरच्या बाहेर कचराच कचरा असतो. तरी तुम्ही शांत असता. तुमचे कामे वेळेत हवे असते त्या साठी तुम्ही अमाप पैसे देऊ करतात आणि पुढचा अधिकारी, कर्मचारी पैसे घेतात तरी तुम्ही शांत असता वाटेल तेवढा भ्रष्टाचार जो वाढला तो फक्त तुमच्या मुळे कारण त्यांना तुम्ही सोकून ठेवले. बीड च्या राजकारण्याना तुम्हीच सोकून ठेवले कारण त्यांनी तुमचे मत विकत घेतेले ते पैसे देत गेले आणि तुम्हाला दोन पाचसे रूपयात त्यांनी विकत घेतले. गंमत वाटते की तुमची किमंत इतकी कमी आहे. तुम्ही लोक इतके स्वस्त आहात म्हणूनच राजकारणी तुमच्या समस्या वर आजतागायत राजकारण करून भाकरी भाजत आहेत.आपण लोक सर्वच ठिकाणी गप्प असता. डॉक्टर लोक तपासणी फीस ५०० वर घेतात आणि सर्जरी काही असेल तर कित्येक लाखात विचारू नका ते हि तुम्ही निमूटपणे सहन करता नसतील पैसे तर शेती, घरदार विकून या डॉक्टर लोकांना देतात.बर एवढे पैसे देऊन कित्येक आपले पेशंट जगत नाहीत.

कपड्याच्या दुकानदार कपड्यावर

तीन-चार पटीने रेट लावून सुद्धा त्याच्या दुकानात लिहिले असतें की ''एकच भाव, भावात कमी करू नका'' तुम्ही लोक तिथे हि शांत असतात. तुमच्या कडे कागद पत्र सर्व असूनही कोणत्या ना कोणत्या कारणाने ट्रॅफिक पोलिसाच्या खिशात पैसे टाकतात. असे असंख्य उदाहरणं आहेत की जिथे तुम्ही गप्प आणि गप्पच बसतात. पैसे देऊन मोकळे होतात. सामान्य लोकांहो तुमच्या मुळे हे सर्व चुकीचे साम्राज्य उभे राहिले आहे

याला तुम्ही भेदणार कसे या चक्रव्यूयात पूर्ण अडकलात.हे चक्र आता भेदणार कसे आणि कधी पिढ्या न पिढ्या असे चालत असणारे तुम्ही अडकलेल्या भोवऱ्याच्या बाहेर येणार कसे. यात जर तुम्हला कोणी हात दिला तर तुम्ही तो हात सोडतात नाहीतर तुमच्या भोवऱ्यात ओढतात. मग कसे शक्य आहे की विकसनशील शहरात राहता. काही छोट्या छोट्या गोष्टीतून तुम्ही भ्रष्टाचार सुद्धा कमी करू शकतात. पैसे देऊ नका कोणत्याही शासकीय कामात.गाडी लायन्स,ट्राफिक पुलिस,सरपंच्यापासून जिल्हा अधिकाऱ्यां पर्यंत कोणत्याच कामात पैसे देऊ नका आणि अधिकाऱ्यांनो थोडी तरी लाज बाळगा तुम्हला तुमच्या कामासाठी सरकार पगार देते. तरी निर्लज्ज पणे हात पसरून लाच घेऊ नका.



रुपाली देशपांडे
मो.८८८८९५५५३९




जालना: भारतीय जैन संघटना सन २०२५-२६ साठी राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नंदकिशोर साकला, राष्ट्रीय सचिव दीपक चोपडा, आदेश चंगेडिया, राज्य अध्यक्ष श्री केतनभाई शहा, राज्य सचिव प्रवीणजी,पारख , आदी चा सत्कार करताना भारतीय जैन संघटनेचे जालना जिल्हा कार्यकारणी सदस्य नरेंद्र जोगड यांनी केला.

# ह.भ.प.प्रतीक्षाताई कर्डूळे यांची श्रीशिवमहापुराण कथा

**घनसावंगी । प्रतिनिधी**

श्री पशुपतिनाथ मंदिर संस्थान, तीर्थपुरी आयोजित श्री शिवमहापुराण कथेच्या आज सहाव्या दिवशी कथा प्रवर्तक ह भ प प्रतीक्षा महाराज करडूळे यांनी भगवान श्रीकृष्णाची वृंदावनातील महारास क्रीडा कथा संगीतमय वातावरणामध्ये सांगितली . झाकी म्हणजेच नाट्य रूपात भगवान श्रीकृष्ण, राधा व गोपिका यांचे रास / दांडिया नृत्य झाले. शाम संगे राधा नाचे रे , किती सांगू मी सांगू कुणाला- आज आनंदी आनंद झाला. उधळीत येरे गुलाल , तू शाम मी राधिका. ही संगीतमय भजने सादर होताच सर्व मंडप उभा राहिला व रास दांडिया नृत्यांमध्ये सहभागी झाला . आयोजकांनी सर्वांना



दांडियासाठी टिपऱ्या पुरवल्या होत्या त्यामुळे तीर्थपुरी येथे वृंदावन निर्माण झाल्याचा भास झाला.

आजच्या कथेची सुरुवात रोजच्या प्रमाणे सामूहिक शंकराची आरती , श्री शंकराय नमोस्तुभ्यम या जपाने व मागे झालेल्या कथेची उजळणी करत झाली . आजच्या निरूपणामध्ये प्रतीक्षा महाराज कर्डूळे म्हणाल्या कथा ही मनोरंजनासाठी नसते तर कथेने घुसळण करून चांगले घ्यायचे ,वाईट काढायचे असते. यासाठी ठाम श्रद्धा ठेवावी लागते. नारायणी नारायनी जय मा दुर्गे नारायणी, जय महाकाली नारायणी. हर हर महादेवा, पार्वती वल्लभ सदाशिवा इत्यादी भजने म्हणत जीवनातले दुःख देवालाही पहावे लागले, आपण वर्तमान काळात जगावे. देवाच्या नावाची नशा करावी असे त्यांनी सांगितले. गौरी-गणपती- विनायक, गंगामाता कथा विशद करताना हर हर गंगे, पापियों के पाप धोते - राम तेरी गंगा मैली हो गई हे गीत त्यांनी गायले. तेरी डमरू की धुन सुनके, मै काशी नगरी आया हुं. या गीतावर सर्वच भाविक भक्त डोलले . सत्यभामा - पारिजातक कथा, रुद्राक्ष देवाच्या आश्रू मधून निर्माण झाले असे सांगत रुद्राक्ष कथा सांगितली . भस्मासुराची कथा ऐकताना भोला सब दुःख काटो हमारा ,शिवशंकर जपू तेरी माला हे भजन झाले. आजचा कथेचा समारोप करताना उद्या प्रदोष व शिवरात्रीचे महत्त्व ही कथा सांगितली जाणार आहे , असे प्रतीक्षा महाराज यांनी सांगितले . संगीतमय श्री शिवमहापुराण कथा रोज रात्री सात ते दहा या वेळेत पशुपतीनाथ मंदिर परिसरामध्ये होत असते . तीर्थपुरी परिसरातील नागरिकांनी याचा लाभ व आनंद घ्यावा असे आवाहन आयोजक श्री पशुपतिनाथ मंदिर संस्थान, तीर्थपुरी च्या वतीने करण्यात आले आहे .

## पान १ वरून...

पान १ वरून...

### अखेर ठरले: देवेंद्र अध्याय

पक्षाचे गटनेते निवडले होते. मात्र भाजपने अजूनही गटनेता निवडला नव्हता. गटनेता निवडण्यासाठी केंद्रीय मंत्री निर्मला सितारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुमाणी यांच्या उपस्थितीत भाजपने बुधवारी आपल्या पक्षाचा गटनेता निवडला. सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव सादर केला तर पंकजा मुंडे आणि प्रविण दरेकर यांनी त्यास अनुमोदन केले. सर्व प्रक्रिया पार पडल्यावर देवेंद्र फडणवीस यांची गटनेता पदी निवड करण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुध्दा फडणवीस हेच होणार असल्याचे आता सिध्द झाले असून देवेंद्र अध्याय ३.० महाराष्ट्रात दि. ५ डिसेंबर रोजी पासून सुरु होणार आहे. २०१९ सालच्या विधान सभा निवडणुकीपुर्वी फडणवीस यांनी मी पुन्हा येईन, असे म्हटले होते. त्यावर राज्यात बरीच दाळ सुध्दा सिजली. ता मुख्यमंत्री झाले पण काही दिवसापुरतेच. पाच वर्षांच्या विश्रांतीनंतर फडणवीस राज्याचे तिसऱ्यांदा पुन्हा मुख्यमंत्री होणार आहेत. त्यामुळे फडणवीस पर्वाच्या दुसऱ्या अध्यायला सुरुवात होणार असल्याचे म्हटले जात आहे.

---------

### विकासकामांच्या वचनपूर्तीसाठी

भव्य मंदिर निर्माण केले जात आहे. या मंदिरासमोरील सभागृहासाठी मी व माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांनी यापूर्वी ५० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. याठिकाणी लोकवर्गणीतून ४० लक्ष रुपयांचे मंदिर उभारले आहे. आपण मंदिर, सभागृह व परिसर विकासाकरिता निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. हे काम अंतिम टप्प्यात असून मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी आता २० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या मंदिराचे काम पूर्णत्वास जात असून लवकरच प्राणप्रतिष्ठापणा सोहळा आयोजित केला जाणार आहे. या धार्मिक कार्यात आपला खारीचा वाटा असल्याचे मनाला समाधान वाटते, असेही डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------------

### गुगलवर सर्वाधिक

ऑक्सफर्ड विद्यापीठाने केली असून, इथं असे शब्द निवडले जातात ज्यांच्याविषयी वर्तमानकाळाच्या अनुषंगाने सर्वाधिक सर्च केले जाते. त्यानुसार २०२४ या वर्षामध्ये वर्ड ऑफ द इयर ठरलेला शब्द म्हणजे, ब्रेन रॉट . दिवसभर सोशल मीडियावर विनाकारण ये-जा करत स्क्रोल करणाऱ्यांसाठी हा शब्द लागू असून, तुम्हीही सोशल मीडियावरच सतत वावरत असाल तर, तुम्हीही ब्रेन रॉटचे शिकार आहात, कारण आता या शब्दाला जागतिक स्तरावर मान्यतासुद्धा मिळाली आहे.

-----------

### दिल्लीवारीबद्दल अजित पवारांचा

पडावी या मागणी ते दिल्लीत दोन दिवस तळ ठोकून होते. अजित पवार म्हणाले की, मी माझ्या वेगळ्या कामाच्या निमित्त दिल्लीला गेलो होतो. मी कोणाला भेटायला गेलो नव्हतो. मस्त चॅनलवाल्यांनी दादा अमित शाहांना कधी भेटणार आज कि उद्या, अशा बातम्या दाखवल्या. मी जर भेटायलाच गेलो नव्हतो, तर मग अमित शाहांनी भेट नाकारण्याचा विषय येतोच कुठे?

यावेळी अजित पवार यांनी एक महत्त्वाची बातमी सांगितले. ते म्हणाले की, या सगळ्यांनी माझी पत्नी सुनेत्रा पवार यांची राज्यसभेवर नियुक्ती केली आहे. त्यांना ११ जनपथ इथे बंगला मिळाला आहे. माझं घर असू द्या किंवा सरकारचे घर, मला ते नीटनीटकं लागते, हे सगळ्यांना माहित आहे. म्हणून मी तिथे आर्किटेक्टला घेऊन काय नियमामध्ये गोष्टी करता येतील, ते पाहण्यासाठी गेलो होतो.

त्यासोबत प्रफुल्ल पटेल आणि माझ्यावर ज्या काही खटले सुरु आहेत. त्याबद्दल मी कधी वकिलांना भेटलो नव्हतो. दिल्लीतील सर्व जबाबदारी प्रफुल्ल पटेल पार पाडत असतात. काल (३ डिसेंबर) ला पक्षाचा चिन्हाची तारीख होती, ती पुढे ढकली होती. तो विषय एकदा सपवावा. आमचा सुप्रीम कोर्टात प्रकरण सुरु आहे. सुप्रीम कोर्ट सर्वांची बाजू ऐकून योग्य निर्णय देईल. पण इथल्या कामामुळे मला कधीच वकिलांना भेटता आलं नाही. त्यांनाही भेटणे अतिशय महत्त्वाचे होते. म्हणून मी दिल्लीला गेलो होतो. तसेच जवळच्या नातेवाईकाचे लग्न होते. या तीन गोष्टींकरीता मी दिल्लीला गेलो होतो, असे अजित पवार म्हणाले.

-----------------

### गेटवे ऑफ इंडियाला

दहतवादी हल्ल्याचा साक्षीदार आहे. ब्रिटिश सम्राट किंग जॉर्ज पंचम आणि राणी मेरी यांच्या पहिल्या भेटीच्या स्मरणार्थ हे स्मारक बांधण्यात आले होते. शाही भेटीच्या वेळी गेटवे ऑफ इंडिया या प्रवेशद्वाराचे बांधकाम पूर्ण झाले नव्हते. यामुळे सम्राटाचे स्वागत कार्डबोर्डच्या संरचनेद्वारे करण्यात आले. डिसेंबर १९११ मध्ये ही संरचना उभारण्यात आली. गुजराती स्थापत्यकलेचा समावेश करून इंडो-सारासेनिक शैलीत गेटवे ऑफ इंडियाचे बांधकाम करण्यात आले. मार्च १९१३ मध्ये या स्मारकाची पायाभरणी करण्यात आली. १९१४ मध्ये वास्तुविशारद जॉर्ज विटेट यांनी स्मारकासाठी अंतिम डिझाइन मंजूर केले. १९२० मध्ये गेटवे ऑफ इंडियाचे बांधकाम सुरू झाले, त्यानंतर ४ वर्षांनी बांधकाम पूर्ण झाले आणि शेवटी ४ डिसेंबर १९२४ मध्ये गेटवे ऑफ इंडिया सर्वसामान्यांसाठी खुले करण्यात आले. ८५ फूट उंच रचना बेसाल्टने बांधलेली आहे आणि त्यावर विजयी कमान आहे. या प्रवेशद्वाराजवळील समुद्रात पर्यटकांना भेट देण्यासाठी बोट सेवाही उपलब्ध आहे. गेटवे ऑफ इंडियाच्या कमानी मुस्लिम शैलीनुसार आहेत. याच्या सजावटीवर हिंदू शैलीची छाप पहायला मिळते. गेटवे ऑफ इंडियाच्या मध्यवर्ती घुमटाचा व्यास ४८ फूट आहे आणि स्मारकाची उंची ८३ फूट आहे. या स्मारकात बांधलेल्या कमानीच्या प्रत्येक बाजूला ६०० लोकांची क्षमता असलेले हॉल देखील आहेत.

------------

## अज्ञात वाहनाच्या धडकेने एक जण ठार

**शिरूर । प्रतिनिधी**

**मोटरसायकल वरून प्रवास करत असलेल्या एका व्यक्तीला अज्ञात वाहणारी जोराची धडक दिल्याने सदरील व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असल्याची घटना कल्याण विशाखापट्टणम या महामार्गावर बुधवारी सायंकाळी ७:३० वाचण्याच्या सुमारास घडली आहे. हा अपघात प्रत्यक्ष पाहिला असल्याचे कोणी सांगत नसल्याने सदरील मोटर सायकल स्वार कोण्या दिशेने येत होता व अज्ञात वाहन कोण्या दिशांनी येत होते याबद्दल काही माहिती मिळू शकली नाही.**

शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी येथील भानुदास पाराजी माळी ही व्यक्ती सायंकाळच्या सुमारास मोटार सायकल वरून कल्याण - विशाखापट्टणम या महामार्गावरून प्रवास करत असताना शिंगारवाडी फाटा जवळ अज्ञात वाहनाने या मोटरसायकलला जोराची धडक दिल्याने मोटर सायकल जागीच ठार झाला आहे. धडक एवढी जोराची होती या धडकेने मोटरसायकलचाही चक्का सुरू झाला आहे. सदरील घटना बुधवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडलेली असताना या घटनेबाबत प्रत्यक्ष पाहणारा, व काही सांगणारा कोणीही उपलब्ध नसल्याने या घटनेबाबत तर्क वितर्क लावले जात आहेत. मोटर सायकल स्वार कोणीकडून येत होता कुणीकडे जात होता याबद्दलची घटनास्थळी काहीही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. सदरील घटनेची माहिती चकलांबा पोलिसांना कळवण्यासाठी या ठिकाणी उपस्थित असलेल्या बघ्यानी चकलंबा पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना फोन केले मात्र याबाबतीत चकलांबा पोलिसांनी कसलीही गंभीरे घेतले नाही. सुमारे दीड ते दोन तासानंतर या ठिकाणी चकलांबा पोलीस स्टेशनचे दोन कर्मचारी आले आणि घटनेचा पंचनामा न करताच अपघातातील मृतदेह ॲम्बुलन्स मध्ये टाकून निघून गेले. या ठिकाणी मयताचे नातलग उपलब्ध नसल्याने पोलिसांकडूनही या मृतदेहाची झाल्याचे पाहायला मिळाले. मात्र या परिसरात राहत असलेल्या लोकांनी या ठिकाणी मदतीसाठी गर्दी केली होती पोलिसांच्या अशा या वागण्यामुळे त्यांनाही मनस्ताप झाला आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. ०५ डिसेंबर २०२४



## अल्पवयीन मुलीवर अत्याचार : आष्टी पोलिस स्टेशनमध्ये तिघांविरोधात गुन्हा दाखल

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

परजिल्हातील एक कुटुंब मागील दोन वर्षापासून आष्टी तालुक्यातील एका गावातील वीटभट्टीवर कामासाठी आले होते. सकाळच्या दरम्यान गावातील शाळेत रेल्वे पटरीच्या बाजूने अल्पवयीन मुलगी जात असताना याच दरम्यान रेल्वेतून अनोळखी तिघेजण उतरले त्यातील दोघांनी हाताला धरून शेजारील शेतात नेत बळजबरीने यातील एकाने अत्याचार केल्याची घटना असुन यातून पिडीता ९ महिन्याची गर्भवती असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असुन



तिघांविरुद्ध सोमवारी आष्टी पोलिस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली जिल्ह्यातील एक कुटुंब मागील दोन वर्षांपुर्वी आष्टी तालुक्यातील एका गावात वीटभट्टीवर कामासाठी आले होते.याच कालावधीत मार्च २०२४ नक्की तारीख माहित नाही. अल्पवयीन १५ वर्षीय मुलगी याच गावातील शाळेत रेल्वे पटरीच्या बाजूने जात असताना अनोळखी तिघेजण रेल्वेतून उतरले व यातील दोघांनी तिच्या हाताला धरून शेजारच्या शेतात घेऊन गेले. यातील एकाने तिच्यावर बळजबरीने अत्याचार केल्याची घटना समोर आली. असून पिडीता यातून ९ महिन्याची गर्भवती असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून २ डिसेंबर रोजी अनोळखी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मागासवर्गीय युवकांनी उद्योग विश्व साकारावे -घनश्यामदास गोयल

**जालना । प्रतिनिधी**

**मागासवर्गीय युवकांना उद्योगाच्या प्रवाहात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना असून युवकांनी या योजनांचा लाभ घेऊन स्वतःचे उद्योग विश्व साकारावे असे आवाहन कालिका स्टील चे संचालक, उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी केले.**

एम. एस. एम. ई.भीम उद्योग अभियाना तर्फे बुधवारी ( ता.०४) हॉटेल सागर ईन मध्ये उद्योजगता जागरूकता कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी घनश्यामदास गोयल बोलत होते. अध्यक्षस्थानी एम. एस. एम .ई. संयुक्त संचालक नरेंद्र इस्टोलकर हे होते. यावेळी उद्योजक सुनील भाई रायठठ्ठा, गोपाल गोयल, सहाय्यक संचालक राहुल मिश्रा ,एन.एस आय. सी. चे व्यवस्थापक बी. एन.बरनवाल, उद्योग केंद्राचे जगदीश जगताप, महाबँक आरसेटी चे संचालक मंगेश डामरे ,भीम उद्योग अभियानाचे संस्थापक संजय भालेराव, महासचिव राजेश राऊत, सिनेअभिनेत्री वैशाली



दाभाडे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

घनश्यामदास गोयल म्हणाले, नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा, घेतलेल्या कर्जाची उद्योगातून परतफेड करून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या उद्यमशीलतेचा ठसा उमटवा असा सल्ला देत अशा उपक्रमांना सहकार्य करण्याची ग्वाही गोयल यांनी दिली. अध्यक्षीय समारोपात नरेंद्र इस्टोलकर यांनी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, क्लस्टर डेव्हलपमेंट याविषयी माहिती देऊन उद्योगात चिकाटी, सातत्य ,कठोर परिश्रमाची तयारी ठेवा असे सांगितले.

राहुल मिश्रा यांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे स्तर ,उत्पादन, सेवा क्षेत्र, मोठ्या उद्योगांना लागणारा कच्चामाल, सौंदर्यप्रसाधने, उत्पादनांची पॅकेजिंग , ब्रॅण्डिंग , ई- मार्केट, शासकीय खरेदी -विक्री ,स्टॅन्ड अप आणि स्टार्टअप याविषयी माहिती दिली. बी. एन. बरनवाल यांनी अनुसूचित जाती, जमाती च्या नवउद्योजकांना कर्ज सुविधा, राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय प्रदर्शनांसाठी सबसिडी, सुविधांबद्दल सखोल माहिती दिली. जगदीश जगताप, मंगेश डामरे, अभिनेत्री वैशाली दाभाडे यांनी मार्गदर्शन केले. संजय भालेराव यांनी भिम उद्योग अभियानाचे ध्येय, युवकांना उद्योगाविषयी प्रेरणा मिळावी, उद्योजक घडावेत अशी भूमिका विषद केली. सुत्रसंचालन आशीष रसाळ यांनी केले तर श्रावण गायकवाड यांनी आभार मानले. भीम उद्योग अभियानाचे प्रदेश महासचिव राजेश राऊत, कार्याध्यक्ष सचिन बावस्कर ,उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र खाडे ,जिल्हा समन्वयक मनोज वाकडे यांना नियुक्तीपत्रे देऊन सत्कार करण्यात आला. कार्यशाळेत सुरेश खंडाळे , डॉ. शिवाजी लहाने,यशवंत राऊत, अनिकेत भालेराव, प्रदीप गौतीस, संगीता राऊत, शितल भारती, संतोषी गिरी, प्रियंका मगरे, सत्यशीला राऊत ,कविता गिरी ,कपिल मगरे यांच्यासह ७५ युवक- युवतींनी सहभाग नोंदवला.

ग्राहकांचे समाधान उद्योगाचा आत्मा : रायठठ्ठा

मध्ययुगीन कालखंडाच्या अगोदर भारत संपूर्ण जगाच्या तुलनेत २५% निर्यात करणारा देश होता. मध्यंतरी २.५% ते ०३.% प्रमाण आले. केवळ स्वतःचा नफा, मला किती उत्पन्न होईल याचा विचार न करता ग्राहकांची आवड -निवड, त्याची कुवत, खरेदी क्षमता लक्षात घेऊन उद्योग उभारणी करा असा मौलिक सल्ला उद्योजक सुनील भाई रायठठ्ठा यांनी याप्रसंगी दिला. उत्पादन आणि पैशाला जात नसते ग्राहक हात सोडतो तेव्हा कोणीच वाचवू शकत नाही. असे सांगून ग्राहकांचे समाधान हाच उद्योगाचा आत्मा असल्याने त्यावर लक्ष केंद्रित करा असे रायठठ्ठा यांनी सांगितले.

## आज होणाऱ्या शपथविधी कार्यक्रमात आमदार प्रकाश सोळंके यांना कॅबिनेट पदी समावेश करावा : रामेश्वर मुंडे

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

आज मुंबई येथे सायंकाळी मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा पार पडणार आहे. बीड जिल्ह्यातील माजलगाव मतदार संघाचा सार्वभौम विकास करणाऱ्या पाचव्यांदा विधानसभा निवडणुकीत विजयी



होणाऱ्या आमदार प्रकाश दादा सोळंके यांचा नवीन नियुक्त होणाऱ्या मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागणी माध्यमांद्वारे धारूर तालुक्यातील कोयाळ येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते रामेश्वर मुंडे यांनी केली आहे.

माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव साहेब सोळंके यांचे चिरंजीव तथा माजी राज्यमंत्री प्रकाश दादा सोळंके यांनी पाच वेळा विधानसभा निवडणुकीत विजय प्राप्त केला आहे. माजलगाव मतदार संघातील जनतेसाठी विकासाची गंगा वाहून आणत सेवा केल्याबाबत आमदार प्रकाश दादांना नवीन मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद देऊन त्यांच्या कामाची पोहोच पावती द्यावी अशी मागणी युवा नेते रामेश्वर मुंडे यांनी माध्यमांद्वारे केले आहे. आमदार प्रकाश दादांनी ही शेवटची विधानसभा मतदारसंघाची निवडणूक असल्याचे जाहीर केले आहे. तीस ते पस्तीस वर्ष महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय असणाऱ्या प्रकाश दादांना मंत्रिमंडळात समावेश करून त्यांच्या राजकीय निवृत्ती आधी त्यांचा बहुमान करावा अशी विनंती मुंडे यांनी केली आहे.

## वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या निवडी जाहीर



**अध्यक्षपदी सतीष सोनवणे तर सचिवपदी महेश सदरे यांची निवड**

वडवणी / प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांच्या आदेशानुसार व डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि बीड जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके यांच्या सुचनेनुसार नुकत्याच वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषद तालुका कार्यकारिणीच्या निवडी जाहीर करण्यात आल्या असून या मध्ये जेष्ठ मार्गदर्शक म्हणून पत्रकार सुधाकर पोटभरे,तालुका अध्यक्षपदी पत्रकार सतीष सोनवणे, सचिवपदी पत्रकार महेश सदरे, उपाध्यक्ष पदी पत्रकार धम्मपाल डावरे, कोषाध्यक्ष पदी पत्रकार वाजेद पठाण यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. या निवडी बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या जात आहेत.

याबाबत अधिक वृत्त असे की, वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यकारणी निवडी बद्दल अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांच्याकडे माहिती देण्यात आली होती. त्यांच्याच आदेशानुसार व उपस्थिती मध्ये आणि डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके यांच्या सुचनेनुसार नुकतीच एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करून तालुका स्तरावर परिषदेचे उपक्रम राबविण्याबरोबरच वरिष्ठांच्या आदेशानुसार कामकाज केले जावे. अशा सुचना देण्यात आल्या. मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांच्या उपस्थितीत डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी या बैठकीत पदाधिकारी निवडी संदर्भात विषय मांडला. त्यानुसार तालुका स्तरावर परिषदेचे मार्गदर्शक म्हणून पत्रकार सुधाकर पोटभरे, तालुका अध्यक्षपदी पत्रकार सतीष सोनवणे, सचिवपदी पत्रकार महेश सदरे, उपाध्यक्ष पदी पत्रकार धम्मपाल डावरे, कोषाध्यक्ष पदी पत्रकार वाजेद पठाण यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. या निवडी नंतर मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांच्या हस्ते व डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

## डॉ.राजेश इंगोले यांना आयएमएचा नॅशनल प्रेसिडेंटस एँप्रेसिएशन अवॉर्ड फॉर बेस्ट कल्चरल ऍक्टिव्हिटी हा अत्यंत प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इंडीयन मेडीकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांना इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या नॅशनल प्रेसिडेंटस एँप्रेसिएशन अवॉर्ड फॉर बेस्ट कल्चरल ऍक्टिव्हिटी या अत्यंत सन्मानाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. इंडीयन मेडीकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष म्हणून केलेल्या कार्याबद्दल व समिती तर्फे महाराष्ट्रातील डॉक्टर्ससाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची पावती त्यांना मिळाली आहे. महाराष्ट्रात आजपर्यंत हा पुरस्कार फक्त डॉ.राजेश इंगोले यांना जाहीर झाला आहे. त्याबद्दल डॉ.इंगोले यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

यापूर्वीही डॉ.इंगोले यांना इंडीयन मेडीकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने दिला जाणारा व अत्यंत प्रतिष्ठेचा असा राज्यस्तरीय डॉ.सुरेश नाडकर्णी व आय.एम.ए.एम.एस प्रेसिडेंट ऍप्रेसिएशन अवॉर्डस फॉर बेस्ट कल्चरल ऍक्टिव्हिटी या पुरस्काराने गौरवण्यात आले होते. तसेच अंबाजोगाई शाखेचे अध्यक्षपद भूषविताना त्यांना आय.एम.एचे दोनदा बेस्ट प्रेसिडेंट व दोनदा बेस्ट ब्रँच हे राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते.

सांस्कृतिक समितीच्या महाराष्ट्र राज्याचे अध्यक्षपद भूषविताना त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील डॉक्टर्ससाठी विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी पुणे येथे साहित्यिक डॉक्टर्ससाठी पहिल्यांदाच शब्दशारदा साहित्य संमेलन भरवले होते. तसेच त्यांनी गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, रिल्स स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, नाट्य स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा अशा विविध



प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करून महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्ससाठी एक सशक्त व्यासपीठ निर्माण करून वैद्यकीय क्षेत्रात सांस्कृतिक चळवळ गतिमान केली. त्यांच्या या उल्लेखनिय कामगिरीबद्दल त्यांना इंडीयन मेडिकल असोसिएशन राष्ट्रीय कार्यकारणीने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. त्यांच्या या अभिनमानस्पद कामगिरीबद्दल त्यांचे सर्वस्तरांतून स्वागत व अभिनंदन होत आहे. या पुरस्कारांबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, इंडीयन मेडीकल असोसिएशनचा अत्यंत प्रतिष्ठेचा व ज्या पुरस्काराचे स्वप्नं संघटनेचा प्रत्येक डॉक्टर पाहतो हा पुरस्कार मला मिळाला हे माझ्यासाठी स्वप्नवत आहे. संघटनेने माझ्या सांस्कृतिक कार्याची दखल घेऊन हा राष्ट्रीय पुरस्कार मला दिला. याचे श्रेय मला नेहमीच तोलामोलाची साथ व सहकार्य देणारे डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, डॉ.विजय लाड, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.योगेश मुळे, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.श्रीनिवास रेड्डी यांच्यासह जेष्ठ मार्गदर्शक डॉ.सुधीर देशमुख, डॉ.दिलीप खेडगीकर, डॉ.एन.पी.देशपांडे, डॉ.उत्तम निसाले, डॉ.शैलेश वैद्य, यांच्यासह सर्व आयएमएच्या जेष्ठ आणि श्रेष्ठ साथीदारांचे आहे. हा पुरस्कार मी त्यांना समर्पित करतो. सांस्कृतिक समितीचे अध्यक्षपद भूषविताना या कार्यात मला साथ देणाऱ्या सांस्कृतीक समिती सदस्य डॉ.गितांजली शर्मा, डॉ.तुकाराम मुंढे, डॉ.मोहिनी गानू, डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ.राजश्री सावंत, डॉ.माया भालेराव, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.प्रफुल्ल जटाळे, डॉ.राजन जोशी, डॉ.वैष्णवी पाटील, डॉ.पल्लवी दोडके, डॉ.सारंग दराडे यांना हा पुरस्कार मी समर्पित करतो असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले. हे यश माझ्या विविध संकल्पनांना मूर्त स्वरूप देणाऱ्या या सर्व साथीदारांचे आहेत त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. असेच कार्य पुढे करीत राहील अशी आपणांस ग्वाही देतो. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. पुरस्कार वितरणाचा शानदार भव्य कार्यक्रम हैदराबाद येथे हायटेक्स आय.एम.ए हॉल येथे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. टी असोकन व राष्ट्रीय सचिव डॉ.अनिलकुमार जे.नायक यांच्या हस्ते दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी प्रदान करण्यात येणार आहे. डॉ.राजेश इंगोले यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.अग्रवाल, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.संतोष कदम, सचिव डॉ.अनिल आव्हाड, माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.रवी वानखेडकर, डॉ.जयेश लेले, डॉ.अनिल पाचनेकर, डॉ.सुहास पिंगळे, माजी राज्याध्यक्ष डॉ.दिनेश ठाकरे, माजी राज्यसचिव डॉ.सौरभ संजनवाला माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र कुटे, डॉ.रामकृष्ण लोंढे, नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ.संजय पाटील,डॉ संजय कदम, डॉ.रंजन संचेती, डॉ.मीनाक्षी कुलकर्णी, डॉ.स्नेहलता पटवर्धन, डॉ.राजीव जेथलिया यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. मिळालेल्या पदाला झोकून देऊन न्याय देण्याची व प्रभावी कार्य करण्याची डॉ.राजेश इंगोले यांची शैली त्या पदाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवते. तसेच त्या पदाला वलय प्राप्त करून देते व त्या पदाला डॉ.इंगोले हे योग्य न्याय देतात असे मत राष्ट्रीय सचिव डॉ.अनिलकुमार जे.नायक तसेच सर्व राज्याच्या पदाधिकाऱ्यांनी या निमित्ताने व्यक्त केले.

## पंकजाताई मुंडे यांना मंत्रीमंडळात मंत्री म्हणून स्थान द्यावे -काजल बांगर

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी नेहमीच भाजप पक्षाला तळागाळात नेहण्यासाठी धडपड केली पक्षा सोबत एकनिष्ठ राहुन जनतेसाठी अहोरात्र मेहनत घेतली अन्? त्यांचा राजकीय वारसा जपत लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी विधानसभेसाठी स्टार प्रचारक म्हणून विडा उचलला आणि तो पूर्ण केला. जास्तीत जास्त सभा घेऊन आमदार निवडून आणले ताईंनी जीवाचे रान केले. हात फॅक्चर असताना देखील त्यांनी दिवस-रात्र करून जेवण देखील हेलिकॉप्टर मध्येच केले अशा



लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे यांना राज्याच्या मंत्रिमंडळात घ्यावे अशी मागणी आष्टी तालुक्यातील कारखेल येथील त्यांच्या चाहती समर्थक काजल बांगर यांनी केली आहे.

विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने दिलेली जबाबदारी आ. पंकजाताई मुंडे यांनी पूर्णपणे पार पाडून महायुतीचे आमदार सरकारला दिले अन्? एक हाती सत्ता येण्यासाठी पंकजाताई मुंडे यांचा खारीचा नव्हे तर...सिंहाचा वाटा असल्याची चर्चा सद्या होतं आहे महायुतीच्या नेत्यांनी ठराविक सभा घेतल्या. या विधानसभा निवडणुकीत सहभाग घेतला तो फक्त आ. पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांनीच, पैकीच्या पैकी आमदार निवडून आणले. लाडक्या बहिणीचा आम्हाला फायदा झाला लाडक्या बहिणींनी आम्हाला पूर्णपणे पाठिंबा दिला.आता महाराष्ट्राच्या जनतेच्या मनातील इच्छा म्हणजे पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या कष्टाचे फळ म्हणून त्यांना मंत्रिमंडळात घेऊन चांगले खात द्यावे या संधीचे त्या नक्की सोनं करतील असा विश्वास काजल यांनी व्यक्त केला.



आ. पंकजाताई मुंडे लाडक्या बहिण नाहीत का? ताई तर तुमची बहीणच आहे ना! सर्व महिलांना लाडकी बहिण म्हणुन तुम्ही संबोधले अन्? त्यांना आर्थिक मदत सुद्धा केली मग या लाडक्या बहिणीला सुद्धा मंत्री करा मग बंघा भाजप पक्षावर प्रेम करणाऱ्या संख्येत वाढ होऊन पंकजाताई मुंडेवर प्रेम करणाऱ्या इच्छा पुर्ण होईल तुम्ही सर्वजण मिळून ताईंना मंत्री पद देऊन त्यांनी केलेल्या कष्टाचे फळ होईल त्यांना मंत्रिमंडळात घेऊन मंत्री कराच एकदा! त्यासाठी आम्ही सर्वजण समर्थन देतो. होऊन जाऊ द्या, अशी मागणी काजल बांगर या पंकजाताई यांच्या चाहतीने केली आहे.

## सामाजिक उपक्रमातुन होणार खासदार रजनीताई पाटील व सोनिया गांधी यांचा वाढदिवस साजरा

**बीड । प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या राज्यसभा खासदार रजनीताई अशोकराव पाटील यांचा ०५ डिसेंबर रोजी ६६ वा वाढदिवस व सोनियाजी गांधी यांचा ०९ डिसेंबर रोजी ७८ वा वाढदिवस असुन बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने या दोन्ही मातृतुल्य नेतृत्वचा जन्मदिनाच्या औचीत्याने बीड तालुक्यासह जिल्हाभरात दिनांक ०५ डिसेंबर ते ११ डिसेंबर पर्यंत रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, कांकलेश्वर मंदिर महाभिषेक, शहेंशवली दर्गा येथे चादर



चढवणे, निराधार, अंध, अपंग, कामगार, गोरगरीब यांना किराणा साहित्य , धान्य, ब्लँकेट वाटप इत्यादीसह विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती बीड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी दिली आहे.

पान ६ वरून...

### माहिती अधिकार कार्यकर्ता

व समाजामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ चा प्रसार व प्रचार करावा,अशी अपेक्षा आहे.आपण पदांचा जबाबदारीने वापर करावा,असे सदरील पत्रात नमूद करण्यात आले आहे.तसेच पुढील कार्यासाठी त्यांचे या संघटनेचे वतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.तसेच त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### ईव्हीएम विरोधात आंदोलन

तरी आपण वरील सुचनेचे पालण न केल्यास व दिनांक ०५ डिसेंबर गुरुवार रोजी माजलगाव शहरात मशीन प्रेत यात्रा काढल्यास आपल्याविरुध्द प्रचलित कायद्यानूसार कारवाई करण्यात येईल व मा. न्यायालयात ही नोटीस पुरावा म्हणून सादर करण्यात येईल. याची गांभिर्याने नोंद घ्यावी. आसा इशारा दिला आहे.या संदर्भात भाई गंगाभीषण थावरे यांनी पोलीसांनी दिलेल्या नोटीशीचा आदर राखत सदरील आंदोलन पुढे ढकलून दि १० डिसेंबर रोजी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### अंबाजोगाईत साडेदहा

यावेळी १० लाख ६७ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला.या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक बाळराजे दराडे, पोलीस उपनिरीक्षक घाडगे, जायभाये, मोराळे, मुंडे, नागरगोजे, मस्के, सानप आदींनी केली.

### गटनेतेपदी फडणवीस

येथे मोठा दिमाखदार सोहळ्यामध्ये साडेपाच वाजता देवेंद्र फडणवीस हे तिसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार असल्याची घोषणा झाल्यानंतर आष्टी शहरामध्ये आमदार सुरेश आण्णा धस मित्र मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्याची आतिषबाजी करत देवेंद्र भाऊ बाहुबली की जय हो सुरेश आण्णा धस आगे बडो हम तुम्हा रे साथ हैअशा घोषणा देत आनंदोत्सव साजरा केला यावेळी नगरपंचायतचे नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष सर्व नगरसेवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जपा विधीमंडळ गटनेतेपदी मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली. आमदार सुरेश आण्णा धस यांनी अभिनंदन केले.

त्यांच्या अनुभवी नेतृत्वाखाली, महाराष्ट्राच्या विकासाचा मार्ग आणखी दृढ आणि गतिमान होईल. त्यांच्या कार्यशक्तीने आणि राजकीय कौशल्याने पक्ष आणि राज्याचे भवितव्य उज्ज्वल होईल, असा विश्वास आहे.

## कृष्णा जोशी यांना ज्योतिष शास्त्री पदवी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पात्रुड येथील कृष्णा कल्याण जोशी यांना महाराष्ट्? जोतिष परिषदेच्या वतीने ज्योतिष शास्त्री पदवीने नाशिक येथे त्यांचा सन्मान करण्यात आला.

कृष्णा जोशी यांचे शिक्षण शुक्ल यजुर्वेद कण्व शाखा व अथर्ववेद शौनक शाखा, ऋग्वेद मंत्र संहिता तसेच ज्योतिष शास्त्रात पारंपारिक वैदिक ज्योतिष, रत्नशास्त्र, अंकशास्त्र, रमलविद्या ताजिक पध्दती, मेदनीय ज्योतिष प्रश्नशास्त्र,ज्योतिष गणित, ज्योतिष फलादेश, ज्योतिष परिचय निबंधलेखन आदी अभ्यासक्रम पुर्ण करून त्या विषयांच्या असलेल्या कठीण परिक्षेत उत्तीर्ण




झाल्याने महाराष्ट्? जोतिष परिषद मुंबई यांच्या वतीने ता. १ डिसेंबरला नाशिक येथे ३६ व्या दिक्षांत समारंभात ज्योतिष शास्त्री या पदवीने कृष्णा जोशी यांना अर्थतज्ञ डॉ. विनायक गोविलकर, प्रा. गोविन्द पाण्डेय, परिषदेचे अध्यक्ष अनिल चांदवडकर, स्वागतोत्सुक संदीप जोशी, अरूण चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कृष्णा जोशी यांच्या यशाबद्दल माजी सरपंच एकनाथ शिंदे, घनश्याम भुतडा, सरपंच लतिफ मोमीन, भानुदास भुजबळ, सत्यप्रेम नाटकर, बाळासाहेब बनकर, डॉ. प्रकाश शिंदे, नवनाथ चाळक, अनिल आवाड, संतोष घुबडे, बाळासाहेब शिंदे यांचेसह त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर शहराच्या जवळ असणाऱ्या घाटामध्ये माजलगाव येतील विशाल कोंडीबा काळे या बावीस वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची घटना दी.०४ डिसेंबर रोजी दुपारी एक वाजण्याच्या आसपास उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली .माजलगाव येथील विशाल कोंडीबा काळे वय २२वर्षे रा. ढेपेगाव (चिंचोली) ता.माजलगाव येथील रहिवाशी असल्याचे समजते हा तरुण पंढरपूर येथील एका लॉजवर कामाला जात असल्याची प्राथमिक माहिती समोर आहे.त्याचे आई ,वडील, भाऊ ऊसतोडीसाठी कर्नाटकात गेले असल्याचे समजते घरी वयोवृद्ध आजी असते.विशाल कामा निमित्त पंढरपूरला जात असल्याचे सांगून ०३ डिसेंबर रोजी तो घरिहून बाहेर पडला तो पंढरपूरला जाण्या आधी धारूर येथे थांबला व ०३ डिसेंबरच्या रात्रीच धारूर येथील घाटात आंब्याचा झाडाला गळफास



घेऊन आत्महत्या केली असल्याची प्राथमिक माहितीच्या आधारावर शक्याता असल्याचे समोर आले आहे अजून आत्महत्या करण्याचे कारण समोर आले नाही घाटातील दरीमध्ये ०४ डिसेंबर रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास एका वाटसुरू नागरिकांला आंब्याच्या झाडाला लटकलेले प्रेत अढळून आले असता त्यांने याबाबद धारूर पोलीस स्टेशनला माहिती कळवली माहिती मिळताच धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी पोलीस कॉन्स्टेबल गवळी, धम्मानंद गायसमुद्रे,तुकाराम चांदणे सह इतर कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेत सदरील प्रेत झाडाला लटकले प्रेत खाली घेऊन व शवविचेधनासाठी धारूर ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. ही घटना धारूर शहरात पसरल्याने एकच खळबळ उडाली आहे.या घटनेचा पुढील तपास धारूर पोलीस करत आहेत.

cmyk

# लाल कांद्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी; क्विंटल मागे मोठी घसरण

नाशिक : एकीकडे श्रीलंका सरकार ने आयात शुल्कात मोठी कपात केल्यामुळे त्याचा फायदा होऊन कांद्याच्या भावात वाढ होईल अशी अपेक्षा शेतकरी बाळगून होते. मात्र कांदा दरात सुधारणा होण्या ऐवजी घसरण सुरु झाल्याचे पाहायला मिळाले आहे. परिणामी, लासलगाव, मनमाड, नांदगाव आदी बाजार समित्यांमध्ये लाल कांद्याच्या सरासरी दरात प्रति क्विंटल ८०० ते १००० रुपयांची घसरण झाली आहे.

गेल्या आठवड्यात लाल कांद्याला प्रति क्विंटल ४ हजार ३०० रुपये भाव मिळाला होता. आज त्याचं कांद्याला सरासरी ३ हजार ५०० रुपये भाव मिळाला आहे. कांदा दरात मोठी घसरण झाल्याने कांदा उत्पादक शेतकरी पुरता हवालदिल झाले असून लाल कांद्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी येण्याची वेळ आली आहे. एकीकडे ढगाळ हवामानामुळे लागवड केलेल्या कांद्यावर करपा आणि बुरशीजन्य रोग लागत असतांना त्यावर महागडी औषधे मारावी लागत आहे. तर दुसरीकडे कांद्याच्या दरात घसरण झाल्याने शेतकरी दोन्ही बाजूने होरपळला जात आहे. फेंगल चक्रीवादळाच्या भीतीने कांद्याची आवक वाढली

दुसरीकडे, तामिळनाडूतील फेंगल चक्रीवादळाच्या भीतीने सोलापुरात कांद्याची आवक वाढली आहे. सोलापूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील दोन दिवसात जवळपास ८५० ट्रक कांद्याची आवक झाली आहे. चक्रीवादळामुळे पावसाची भिती असल्याने अनेक शेतकऱ्यांनी कच्चा कांदा बाजारात आणला आहे. दरम्यान, कांद्याची आवक जास्त आणि कच्चा कांदा असल्याने बाजारात कांद्याचे दर घसरले आहेत. सर्वसाधारण कांद्याला प्रतिक्विंटल दोन हजार ते तीन हजार रुपये भाव मिळतो आहे. तर उच्च प्रतीच्या कांद्याला प्रतिक्विंटल चार हजार ते पाच हजार रुपयांपर्यंत भाव मिळतो आहे.



**मागील आठवड्यात लाल कांदा भाव(प्रति क्विंटल)**

| | |
|---|---|
| कमीत कमी | - १५०० रू, |
| जास्तीत जास्त | - ५५०० रू |
| सरासरी | - ४३०० रू |

**आजचे लाल कांदा भाव**

| | |
|---|---|
| कमीत कमी | -१००० रू |
| जास्तीत जास्त | -५१०१रू |
| सरासरी | - ३५०० रू |

काय भाव मिळाला ?

सोमवारी ५८७ गाड्यांतून आला मार्केट यार्डात कांदा आला. ३०० गाडया भरून कांदा आवक सरासरी गेल्या आठवडपात होती. शेतकऱ्यांना १००० हजार ते ५००० हजार रुपये मिळाले. जुन्या कांद्याला साधारण ५००० हजार रुपये भाव मिळाला होता. सोमवारी मराठवाडा आणि शेजारच्या कर्नाटकातून कांदा मोठ्या प्रमाणात सोलापुरात आला आहे. आगामी काही दिवसात अजून कांद्याची आवक होण्याची शक्यता आहे. सोमवारी लाल कांद्याला सोलापूर बाजारात २६०० रुपये, बारामती बाजारात ५००० रुपये, येवला बाजारात २९०० रुपये, लासलगाव विंचूर बाजारात ३८०० रुपये तर देवळा बाजारात ३५०० रुपये दर मिळाला.

## कमी पाण्यात तयार होणारे गव्हाचे वाण

गव्हाच्या अधिक उत्पादनासाठी योग्य वाणांची व जातीची पेरणी केल्यास पिकांचे चांगले व अधिक उत्पादन मिळू शकते. पेरणी वेळेवर आणि चांगली काळजी घेणे आवश्यक आहे. जिरायत गव्हाची पेरणी ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवडयात करावी. बागायती गव्हाची पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. या कालावधीत गव्हाची पेरणी केल्यास उत्पादन चांगले येते. बागायती गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबर नंतर उशिरा केल्यास प्रत्येक पंधरवड्यात हेक्टरी २.५ क्विंटल उत्पादन कमी येते. १५ डिसेंबरनंतर पेरलेले गव्हाचे पीक फायदेशीर ठरत नाही.

कमी पाण्यातील गव्हाच्या सुधारित जाती : नेत्रावती (एन आय ए डब्ल्यू: १४१५) - पाण्याची उपलब्धता कमी प्रमाणात असल्यास एन.आय.ए.डब्ल्यू-१४१५ (नेत्रावती) या सरबती वाणाची लागवड करावी. पाऊस कमी असल्याने नेत्रावती या वाणाची पेरणी शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते. या जातीसाठी महाराष्ट्रातील हवामान विशेष पूरक आहे. हे वाण तांबेरा रोगास प्रतिकारक असून जिरायती क्षेत्रात १०५ ते १०८ व मर्यादित सिंचनाखाली १०८ ते १११ दिवसात कापणीस तयार होते.या जातीची पेरणी ही ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

पंचवटी (एन.आय.डी.डब्ल्यू: १५) - या जातीला एन आय डी डब्ल्यू-१५ म्हणून ओळखले जात आहे. हा महाराष्ट्रात पेरणीसाठी शिफारशीत वाण आहे. हा वाण जिरायती भागासाठी शिफारशीत करण्यात आला आहे. हेक्टरी ७५ ते १०० किलो बियाणे वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दाणे टपोरे, चमकदार आणि आकर्षक असून तांबेरा रोगास प्रतिकारक आहे. पीक १०५ ते ११० दिवसांत कापणीस तयार होते.

शरद (एकेडी डब्ल्यू-२९९७-१६)- जिरायत पेरणीसाठी एकेडी डब्ल्यू-२९९७-१६ (शरद) हे वाण उपयुक्त आहेत. हा देखील गव्हाचा एक प्रमुख वाण आहे. महाराष्ट्र राज्यासाठी या जातीची शिफारस करण्यात आली आहे. जिरायती भागासाठी हा वाण फायदेशीर ठरतो. जिरायती पेरणीसाठी उपयुक्त असल्याने सिफारस करण्यात आली आहे. हेक्टरी ७५ ते १०० किलो पर्यंतचे बियाणे वापरले पाहिजे.

## मत्स्यपालनात अशी घ्या काळजी

भौतिक, रासायनिक आणि बदलत्या जलीय वातावरणात जैविक वैशिष्ट्ये नेहमीच गतिमान असते. संधीसाधूपणासह पाण्याच्या गुणवत्तेचा ऱ्हास रोगाच्या प्रादुर्भावासाठी बहुतेकदा रोगजनक जबाबदार असतात. कोणत्याही संसर्गजन्य घटकांमुळे होणारे रोग, पौष्टिक असंतुलन आणि पर्यावरणीय ताणामुळे एक मासा संवेदनाक्षम होतो. तापमानाचे निरीक्षण, विरघळलेला ऑक्सिजन, अमोनिया, पीएच, हायड्रोजन सल्फाइड, निलंबित घन पदार्थ, आणि पाण्याची क्षारता यांच्या चढ उतारामुळे सुद्धा माश्यांना रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो, म्हणून वेळोवेळी या प्यारामिटर्स ची खात्री करणे सुद्धा तितकेच आवश्यक आहे. या प्यारामीटर्स ची इष्टतम पातळी समतोल राखली गेली पाहिजे जेणेकरून पर्यावरणाला कोणताच ताण पडणार नाही.

मत्स्यपालनामध्ये, रोगाचा प्रादुर्भाव ही एक महत्त्वपूर्ण आर्थिक चिंता आहे, जी रोगजनक आणि जलीय वातावरण यांच्यातील परस्पर संवादामुळे उद्भवते. असंतुलन, अनेकदा रोग साथीच्या रूपात प्रकट होण्यामुळे माशांच्या उत्पादनावर गंभीर परिणाम होऊ शकतो. परिणामी मत्स्य उत्पादकांचे मोठे आर्थिक नुकसान होते. मत्स्य पालनातील अंदाजे १५% उत्पादन नुकसानास रोग जबाबदार आहेत. मत्स्यपालन उद्योगात



माशांचे आरोग्य जपण्यासाठी, आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी, अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि शाश्वत रोग नियंत्रण पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी प्रभावी रोग व्यवस्थापन महत्त्वाचे आहे.

माशांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करून, माशांच्या रोगांसाठी तणाव हे प्राथमिक कारण आहे. गर्दी, खराब पाण्याची गुणवत्ता, अपुरे पोषण, तापमानातील अचानक चढउतार आणि औषधे आणि रसायनांचा अतिवापर यासह विविध कारणांमुळे तणाव निर्माण होऊ शकतो. अशा तणावामुळे माशांच्या लोकसंख्येमध्ये रोगांचा विकास होऊ शकतो. पावसाळ्यानंतर तलावाच्या पाण्यात कार्बन डाय ऑक्साईडची वाढलेली पातळी, पाण्याच्या तापमानातील चढउतार आणि रोगजनक रोगजनकांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे यासारख्या घटकांमुळे माशांमध्ये रोगाचा प्रादुर्भाव होण्याची वेळ प्रभावित होऊ शकते.

मत्स्य पालनातील या आव्हानांना तोंड देण्यात अयशस्वी झाल्यास मत्स्य उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतात. निरोगी आणि सुरक्षित मत्स्यपालन पद्धती राखण्यासाठी, योग्य रोग व्यवस्थापन धोरणे अंमलात आणणे अत्यावश्यक आहे. या धोरणांमध्ये तणाव कमी करणे, पाण्याची गुणवत्ता नियंत्रण आणि औषधांचा जबाबदार वापर यांचा समावेश असावा. याव्यतिरिक्त, रोगजनक निरीक्षण क्षमता वाढवणे, संतुलित पोषण प्रदान करणे आणि पाण्याच्या गुणवत्तेचे प्रभावी व्यवस्थापन सुनिश्चित करणे ही रोग प्रतिबंधक आणि शाश्वत मत्स्यपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक पावले आहेत.

## शेळी,मेंढीतील विषाणूजन्य आजार


व्यवस्थापनामधील त्रुटीमुळे शेळ्या, मेंढ्यांना आजार होतात. यासाठी गोठ्याची स्वच्छता, खाद्य, प्रजनन, गाभणपणातील काळजी, लहान पिलांची काळजी आणि वेळेवर लसीकरण या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. विषाणूजन्य आजारांवर तत्काळ औषधोपचार उपलब्ध नसल्याने प्रतिबंध हाच उपाय आहे.

लाळ्या खुरकूत : सर्वसाधारणपणे सुप्त अवस्थेमधील प्रकार शेळी,मेंढीमध्ये अधिक प्रमाणात आढळतो. दोन आठवड्यांपेक्षा लहान करडांमध्ये अधिक प्रमाणात लक्षणे दिसतात. तोंडामध्ये फोड येतात,जखमा होतात. ४० टक्के शेळ्या,मेंढ्यांमध्ये पायावर फोड, जखमा होतात. सुरवातीस दोन्ही खुरांमध्ये किंवा खुराच्यामधील भागात फोड येतात. काही शेळ्या,मेंढ्यांमध्ये तोंडात फोड येतात. त्यामुळे लाळ गळणे किंवा जीभेने लाळ चाटणे, ताप येणे, इत्यादी लक्षणे दिसतात. जीभ, टाळू,ओठांवर फोड, जखमा असल्यामुळे त्यांना खाता येत नाही. काही नवजात अर्भके कोणतेही लक्षणे न दाखवता अचानकपणे दगावतात. प्रामुख्याने हृदयात होणाऱ्या विकृतीमुळे नवजात अर्भकामध्ये मृत्यूचे प्रमाण वाढते.

उपचार : तोंड, पायांवरील जखमा पोटॅशियम परमँग्नेटच्या द्रावणाने स्वच्छ कराव्यात. जखमांवर ग्लिसरीन तसेच जंतूनाशक मलम लावावे.पशुवैद्यकाकडून तातडीने उपचार करावेत. आजारी शेळ्या, मेंढ्यांना चांगल्या उत्तम प्रतीचे मऊ खाद्य आणि पाणी पाजावे.

प्रतिबंध : संसर्ग झालेल्या शेळ्या,मेंढ्यांना कळपामधून वेगळे करावे. नवीन कळपात समावेश करू नये. कोणतेही खाद्य, वस्तू, माणसे जे संसर्ग झालेल्या शेळ्या,मेंढयाच्या संपर्कात आले असेल ते निरोगी शेळ्या,मेंढयांपासून दूर ठेवावेत. ओएसी टाइप लस वापरावी.वर्षातून दोन वेळा लसीकरण करावे.

देवी : आजार वेगवेगळ्या प्रकारात आढळतो.



ओठ, नाकपुड्या, कान तसेच शेपटीखाली व्रण दिसतात. प्रादुर्भाव झाल्यानंतर २ ते १४ दिवसानंतर लक्षणे दिसायला सुरवात होते. याचा फैलाव कळपातील ९० टक्के शेळ्या, मेंढ्यांमध्ये होतो. प्रथमत: अधिक ताप येतो, जनावर मलूल होते, पडून रहाते. नाक,डोळ्यातून स्त्राव येतो. केस नसणाऱ्या भागात व्रण येतात. करडांमध्ये प्रमाण अधिक असते.

उपचार : निश्चित कोणताही उपचार उपलब्ध नाही. व्रण साफ करावेत, त्यावर मलम लावावे. पशुवैद्यकाच्या सहाय्याने इतर उपचार करून घ्यावेत.

प्रतिबंध : सांसर्गिक प्रादुर्भाव असणाऱ्या भागातून खरेदी करू नये. देवीची लस दरवर्षी नियमितपणे एप्रिल किंवा डिसेंबर महिन्यात द्यावी.

निलजिव्हा : प्रसार हा प्रामुख्याने क्युलिकोइड्स या कीटकांच्या चावण्यामुळे होतो. विषाणू प्रामुख्याने रक्तपेशी निर्मिती करणाऱ्या उती आणि विविध अवयवातील रक्तवाहिन्यांना अपाय करतो. त्यामुळे अतितीव्र, तीव्र, कमी तीव्र आणि जुनाट अशा स्वरूपाची लक्षणे आढळतात. प्रादुर्भाव झाल्यानंतर साधारणतः ३ ते ६ दिवसांत लक्षणे दिसण्यास सुरवात होते. सुरवातीला १०५ ते १०७.५ अंश फॅरनहाइट इतका ताप येतो. प्राथमिक अवस्थेत ओठांवर सूज येते. बाधित शेळ्यांच्या नाकातून पाण्यासारखा स्राव बाहेर येतो. कालांतराने हा स्राव पिवळा होऊन त्वचेस चिकटून राहतो. बाधित शेळ्यांचे वजन झपाट्याने कमी होते. जबड्याच्या वरच्या हिरड्या, जिभेच्या टोकावर व्रण दिसू लागतात. प्रादुर्भावाची तीव्रता अधिक असल्यास, बाधित मेंढ्या तोंड उघडे ठेवून श्वास घेतात. त्यांच्या नाकावाटे फेसाळ स्राव वाहू लागतो. चेहऱ्यावर खालचा भाग, कान आणि जबड्याच्या भागावर सूज येऊन तो लालसर भासू लागतो. गिळताना त्रास होतो. श्वास घेताना मोठ्याने घरघर ऐकू येते. शेळ्यांना वारंवार हगवण होते.

प्रतिबंधात्मक उपाय : पाणी साठून राहणाऱ्या भागात चरायला सोडू नये. कारण अशा ठिकाणी कीटकांची संख्या अधिक असते. एखाद्या विशिष्ट भागात साथ आलेली असल्यास प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे.

मावा : देवीप्रमाणे लक्षणे असणारा विषाणूजन्य आजार शेळ्या,मेंढयामध्ये प्रामुख्याने करडांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. काळसर पापडी पकडलेल्या जखमा नाकाच्या भोवती जास्त प्रमाणात आढळतात. आजाराच्या जखमा कास, शरीराच्या इतर भागात दिसतात. ताप येतो, चारा कमी खातात.

आजार एकदा झाला की,त्याच शेळी,मेंढीमध्ये परत आढळून येत नाही.

प्रतिबंध : आजार विषाणूजन्य असल्यामुळे निश्चित उपचार नाही. प्राथमिक उपचार म्हणून जखमांवर बोरोग्लिसरीन लावावे. आजारी शेळ्या,मेंढ्या वेगळ्या ठेवाव्यात. आजारी शेळ्या,मेंढ्यांवर उपचार करावेत. दरवर्षी प्रतिबंधात्मक लस टोचून घ्यावी.

पीपीआर : आजार अतिशय सांसर्गिक असल्यामुळे एकाच वेळी तो अनेक शेळ्या,मेंढ्यांना झालेला दिसतो. मरतुकीचे प्रमाण अधिक आहे. ताप येतो, नाका-डोळ्यातून पाणी गळते, डोळ्यातून चिपडे येतात. डोळयाभोवती चिकटून बसतात. तोंड व चेहरा सुजतो. हगवण लागते, तोंडाच्या आतील भागात ओठांमध्ये व्रण दिसून येतात. श्वासोच्छ्वासाचा त्रास होतो किंवा खूप जलद श्वास घेतात. पांढऱ्या रक्तपेशीचे प्रमाण अत्यल्प होते. त्यामुळे त्यांची प्रतिकार शक्ती कमी होते. मरतुकीचे सर्वसाधारण प्रमाण ९० टक्के असते.

प्रतिबंध : लक्षणावरुन पशुवैद्यकीय उपायासहीत योग्य काळजी घेतली तर, मरतुक कमीत कमी ठेवता येते. आजारी शेळ्या,मेंढ्यांना कळपातून वेगळे करावे. आजाराने मृत्यू पावलेल्या शेळ्या,मेंढ्यांना जाळावे किंवा योग्य पद्धतीने जमिनीत गाडावे. जेणेकरून प्रादुर्भाव दुसऱ्यांना होणार नाही. दर तीन वर्षानंतर पावसाळा सुरु होण्याअगोदर लसीकरण करावे.

आजाराची कारणे : जिवाणूंमुळे होणारे आजार. विषाणूजन्य आजार. कृमी/जंतूंमुळे होणारे आजार. खाद्यातील कमतरतेमुळे होणारे आजार. बुरशीमुळे होणारे आजार. चयापचय प्रक्रियेतील बिघाडामुळे होणारे आजार.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८१२ : मध्ये नेपोलियन बोनापार्ट ला रशियामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते त्यामुळे तो फ्रांस मध्ये परत आला होता.
१८४८ : अमेरिकन संसदेसमोर केलेल्या भाषणात राष्ट्राध्यक्ष जेम्स पोल्क यांनी कॅलिफोर्नियात मोठ्या प्रमाणात सोने सापडल्याचे सांगितले.
१९०६ : नॅशनल इन्शुरन्स कंपनी ची स्थापना.
१९३२ : जर्मनीत जन्मलेले स्विस भौतिकशास्त्रज अल्बर्ट आईनस्टाईन यांना अमेरिकन व्हिसा देण्यात आला.
१९४५ : फ्लाईट १९, फ्लोरिडा येथून निघालेली अमेरिकन नौदलाची ५ टी.बी. एम. ऍव्हेंजर विमाने स्कॉड्रन बर्म्युडा त्रिकोणात गायब झाली.
१९४६ : भारतामध्ये होम गार्ड संघटनेची स्थापना झाली होती.
१९५० : मध्ये आताचे सिक्कीम हे राज्य भारताच्या संरक्षणाखाली आले होते.
१९५७ : इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकार्नो यांनी सर्व डच नागरिकांना हद्दपार केले.
१९७१ : भारताने बांगलादेश ला एक पूर्ण रुपी देश म्हणून मान्यता दिली होती.
१९७३ : गेराल्ड फोर्ड यांनी अमेरिकेच्या ४० वे उपराष्ट्रपती म्हणून पदभार सांभाळला.
१९८९ : फ्रांसच्या टीजीव्ही रेल्वेने ताशी ४८२.४ किमी गती गाठून विश्वविक्रम केला.
१९८९ : मुलायम सिंह यादव पहिल्यांदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री बनले.
१९९३ : मुलायम सिंह यादव पुन्हा उत्तर प्रदेश चे मुख्यमंत्री बनले.
२००५ : ब्रिटन ने समलिंगी पुरुष आणि समलिंगी स्त्री यांचे संबंध वैध मानल्या जातील असे नवीन कायदा अमलात आणला.
२००८ : काँग्रेस ने अशोक चव्हाण यांना महाराष्टाचे मुख्यमंत्री बनविण्यची घोषणा केली होती.
२०१४ : जागतिक मृदा दिन.
२०१६ : गौरव गिल यांनी आशिया पॅसिफिक रॅली चॅम्पिअनशिप किताब जिंकला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१८ : भारतीय-पाकिस्तानी कवी आणि अनुवादक जोश मलिहाबादी यांचा जन्म. (मृत्यू: २२ फेब्रुवारी १९८२)
१८७२ : भारताचे प्रसिद्ध पंजाबी लेखक, कवी, भाई वीर सिंह यांचा जन्म.
१८९४ : भारताचे माजी रेल्वे मंत्री राहिलेले एच. सी. दासप्पा यांचा जन्म
१८९७ : सेसेना एअरक्राफ्ट कॉर्पोरेशनचे संस्थापक क्लाईड व्हर्नन सेसेना यांचा जन्म. (मृत्यू: २० नोव्हेंबर १९५४)
१८९८ : भारताचे आणि पाकिस्तानचे प्रसिद्ध कवी जोश मलीहाबादी यांचा जन्म.
१९०१ : वेर्नर हायसेनबर्ग 'क्वांटम मॅकॅनिक्स'मधील मूलभूत संशोधनासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९३२) जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १ फेब्रुवारी १९७६)
१९०५ : शेख अब्दुल्ला - शेर ए कश्मीर (मृत्यू: ८ सप्टेंबर १९८२)
१९२७ : भुमिबोल अदुल्यतेज ऊर्फ राम (नववा) थायलँडचा राजा
१९३१ : १४ वे नौसेनाप्रमुख ॲडमिरल जयंत नाडकर्णी यांचा जन्म.
१९३२ : ला भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री नादिरा यांचा जन्म.
१९३८ : ला गुजरातचे प्रसिद्ध साहित्यकार रघुवीर चौधरी यांचा जन्म.
१९४३ : लक्ष्मण देशपांडे - 'वऱ्हाड निघालंय लंडनला' साठी प्रसिद्ध असलेले लेखक, दिग्दर्शक व प्राध्यापक (मृत्यू: २२ फेब्रुवारी २००९)
१९६५ : भारतीय फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांचा जन्म.
१९६९ : ला भारतीय शुटर अंजली भागवत यांचा जन्म.
१९७४ : भारतीय पत्रकार आणि लेखक रविश कुमार यांचा जन्म.
१९८५ : भारतीय क्रिकेटपटू शिखर धवन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९१ : वूल्फगँग मोझार्ट - ऑस्ट्रियन संगीतकार (जन्म: २७ जानेवारी १७५६)
१९२३ : फ्रेंच चित्रकार क्लोद मोने यांचे निधन.
१९२४ : ला भारताचे प्रसिद्ध सामाजिक सेवक तसेच स्वतंत्र सैनिक एस. सुब्रह्मण्य अय्यर यांचे निधन.
१९४१ : ला भारताच्या प्रसिद्ध महिला चित्रकार अमृता शेरगिल यांचे निधन.
१९४६ : प्रवचनकार दादामहाराज सातारकर यांचे निधन.
१९५० : योगी अरविंद घोष क्रांतिकारक, तत्त्वचिंतक, योगी व कवी (जन्म: १५ ऑगस्ट १८७२ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१९५१ : अवनींद्र नाथ टागोर - जलरंगचित्रकार (जन्म: ७ ऑगस्ट १८७१)
१९५५ : ला भारताचे प्रसिद्ध कवी, शायर मजाज़ यांचे निधन.
१९५९ : कुमार श्री दुलीपसिंहजी इंग्लंडचे क्रिकेटपटू, यांच्या स्मरणार्थ भारतात 'दुलीप ट्रॉफी' खेळली जाते. (जन्म: १३ जून १९०५ नवानगर, काठियावाड, गुजराथ)
१९६१ : ला परमवीर चक्राने सन्मानित गुरबचन सिंह सालारिया यांना वीरमरण.
१९७३ : राकेश मोहन - हिन्दी नाटककार (जन्म: ८ जानेवारी १९२५)
१९७३ : रडार यंत्रणेचे शोधक रॉबर्ट वॉटसन-वॅट यांचे निधन. (जन्म: १२ एप्रिल १८९२)
१९९१ : डॉ. वासुदेव विश्वनाथ गोखले - संस्कृततज्ञ आणि बौद्ध धर्माचे अभ्यासक.
१९९९ : वसंत गणेश तथा बापूसाहेब उपाध्ये - स्वातंत्र्यसैनिक, समाजवादी नेते, आमदार आणि शेती व सिंचन या विषयांतील व्यासंगी मार्गदर्शक.
२००४ : ब्राझिलियन फुटबॉलपटू ख्रिश्चन जुनियर यांचे सामना सुरु असताना बेंगलोर येथे निधन.
२००७ : राकेश मोहन - हिन्दी नाटककार म. वा. धोंड टीकाकार (जन्म: ३ आक्टोबर १९१४)
२०१३ : दक्षिण आफ्रिकेचे पहिले श्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांचे निधन. (जन्म: १८ जुलै १९१८)
२०१५ : ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक किशनराव भुजंगराव राजूरकर यांचे निधन.
२०१६ : तामिळ नाडू च्या मुख्यमंत्री जे. जयललिता यांचे तीव्र हृदयविकारानंतर निधन. (जन्म: २४ फेब्रुवारी १९४८).

# रांगोळी व चित्रकला स्पर्धा घेऊन 'जागतिक एड्स' दिन साजरा

आष्टी । प्रतिनिधी

जागतिक एड्स दिना निमित्ताने ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे जिल्हा शिल्लक चिकित्सक डॉ अशोक थोरात सर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री सुहास कुलकर्णी सर, वैद्यकीय अधीक्षक डॉ राहुल टेकाडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेश तांदळे यांच्या संयुक्त विद्यमानाने चित्रकला व रांगोळी स्पर्धा घेऊन एचआयव्ही/ एड्स ची जनजागृती करण्यात आली.

या स्पर्धेसाठी आष्टी व कडा येथील नर्सिंग व फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दि. ३ तारखेला चित्रकला स्पर्धा व ४ तारखेला रांगोळी स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यामध्ये या वर्षाच्या प्रमाणे एचआयव्ही/एड्स या विषयावरती रांगोळी काढून साजरा केला. यावेळी डॉ राहुल टेकाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना समाजात एड्स बद्दल त्या रुग्णांना चांगली वागणूक दिली जात नाही व त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन देखील चांगला नसतो तो कोठेतरी





तो बदलला पाहिजे. समाजात त्यांना जगण्याचा अधिकार दीला पाहीजे आहे. त्यांना आधार देण्याची गरज आहे व लग्न जमवते वेळेस मुलांची व मुलींची एचआयव्ही तपासणी करून घेणे हेही काळाची गरज आहे. एड्स हा आजार कमी करण्यासाठी युवकांनी सहभाग घ्यावा व या आजाराबद्दल असलेली भीती दूर करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा व विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रकला व रांगोळी याबद्दल त्यांचे कौतुक केले .चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक - पवार गायत्री, द्वितीय - उज्वला लाडवी, तृतीय - शेख निझाम, उत्तेजनार्थ - धस ऋतुजा, आणि सावंत श्रद्धा, व रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम - गायकवाड सानिका, द्वितीय- किरण गोविंद काळे, तृतीय - प्रणाली अरखराव, उत्तेजनार्थ - शेख निझाम आणि ऋतुजा जवंजाळ यांना बक्षीस मिळाले. या स्पर्धेसाठी डॉ राहुल टेकाडे, डॉ राजेश तांदळे तालुका आरोग्य अधिकारी सर्व अधिकारी व जन औषधी मेडिकल यांनी स्वतः बक्षीस ठेवून ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी आयसीटीसी विभागाचे श्री जयचंद नेलवाडे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, व समुपदेशक श्री सुनील सरवदे यांनी नियोजन केले. यावेळी डॉ राहुल टेकाडे, डॉ ढाकणे, डॉ जावळे, डॉ इमरान शेख, शेख बी इन्चार्ज सिस्टर, जयचंद नेलवाडे, सुनील सरवदे, स्नेहल राऊत, प्रतिभा गायकवाड, शेख अस्पीया, निकिता कोळी, अश्विनी झुंजारे, प्रीती काळे, मोबीन सय्यद, संदिपान धस, मोहन गलांडे, गौरव साठे, रूपाली पवार, खान सर, झगडे सर, गावडे मॅडम, फुदे मॅडम, जायबा मॅडम, मुरकुटे मॅडम, बबन भवर, व सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## आ. सुरेश धस यांना मंत्रिमंडळात स्थान देण्याची पाटोदा पत्रकार संघाची मागणी

### देवेंद्र फडणवीस यांना पाठवले निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून विक्रमी मताधिक्याने विजयी झालेले भाजप महायुतीचे आमदार सुरेश धस यांना मंत्रिमंडळात स्थान द्यावे अशी मागणी पाटोदा पत्रकार संघाच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्याचे भाजपाचे सर्वेसर्वा देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने म्हटले आहे की आमदार सुरेश धस हे जनतेशी नाळ जोडलेले नेते असून यांना प्रतिकूल परिस्थिती असताना देखील त्यांनी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून विक्रमी मताधिक्याने विजय मिळवला आहे आष्टी पाटोदा शिरूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार धस यांच्यासारख्या नेतृत्वाला बळ देणे अत्यंत गरजेचे आहे धस यांची आमदारकीची देखील ही पाचवी टर्म असून त्यांना यापूर्वी राज्यमंत्रीपद तसेच परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा देखील अनुभव आहे त्यांच्या मंत्रिपदाच्या काळात धस यांनी अत्यंत प्रभावी लोकहिताची विकासकामे केलेली आहेत या मतदारसंघाचा विकासचा अनुशेष भरून काढण्यासाठी सुरेश धस यांना मंत्रिमंडळात संधी मिळणे गरजेचे आहे त्याचप्रमाणे धस यांना संधी मिळाल्यास पक्षाची विचारधारा संपूर्ण मराठवाड्यात तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी देखील मोठा फायदा मिळणार आहे या सर्व बाबी लक्षात घेऊन आपण सुरेश धस यांना महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान द्यावे अशी मागणी पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे,सचिव महेश बेदरे,सल्लागार विजय जोशी, स्वागताध्यक्ष पोपट कोल्हे,पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष अजिज शेख,रियाज शेख,महेशर शेख अध्यक्ष सोशल मिडिया,सचिन गायकवाड उपाध्यक्ष, विजय जाधव उपाध्यक्ष, सुधीर एकबोटे उपाध्यक्ष,अमीरअली शेख कार्याध्यक्ष,किरण शिंदे पाटील सरचिटणीस, चंद्रकांत पवार अध्यक्ष ग्रामीण पत्रकार संघ, बबनराव उकांडे, भाऊसाहेब पवार उपाध्यक्ष,यशवंत सानप कार्याध्यक्ष,सचिन गायकवाड उपाध्यक्ष, अरुण कुलकर्णी सल्लागार,सय्यद रियाज चिटणीस,पोपट राऊत सल्लागार,बळीराम जायभाय सल्लागार, सखाराम भोसले अध्यक्ष प्रेस फोटोग्राफी, राहुल सोनवणे कार्याध्यक्ष प्रेस फोटोग्राफी,दत्ता वाघमारे.अविराज पवार,सुर्यकांत पवळ आदींनी केली आहे.




पाटोदा : शहरामध्ये नगराध्यक्ष राजू जाधव व इतर पदाधिकारी यांनी मिळून महाराष्ट्राच्या विधिमंडळ गटनेतेपदी.मा . श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब.यांची निवड झाल्याबद्दल सुरेश धस यांच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आंबेडकर चौकामध्ये आनंदोत्सव साजरा केला

## आ. प्रकाश सोळुंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा - विश्वास शिनगारे

धारूर । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे अभ्यासु, विकासाची जाण असलेले सर्वसामान्यांचे नेतृत्व प्रकाश सोळके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी राष्ट्रवादी चे कार्यकर्ते .विश्वास . शिनगारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी प्रकाश सोळंके यांना विधानसभेत निवडून पाठवले असून त्यांना मतदार संघाच्या विकासाची जाण आहे तसेच बीड जिल्ह्यात विकासात्मक कामे करायची असतील तर दूरदृष्टीनेता म्हणून प्रकाश सोळंके यांना मंत्रिपद देऊन जनतेची सेवा करण्याची संधी पक्षश्रेष्ठीने देणे गरजेचे आहे. प्रकाश दादा हे मतदारसंघात विविध विकासात्मक कामे करण्यात तरबेज आहेत आज या भागातील शेतकरी समृद्ध झाला आहे तसेच आमदार प्रकाश दादा यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली असुन मतदारसंघात विकासाची गंगा आणलेली आहे. म्हणून त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी त्यांना मतदानरुपी आशीर्वाद देऊन आमदार केले असून पक्षश्रेष्ठीने त्यांना मंत्रीपद देऊन त्यांच्या विकासात्मक कामाचा गौरव करावा अशी मागणी युवा नेते विश्वास शिनगारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे



## थोडक्यात



### सागर जगदाळे याची दुसऱ्यांदा महाराष्ट्र कबड्डी संघात निवड

आष्टी । प्रतिनिधी

२९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान अकोला येथे पार पडलेल्या १९ वर्ष शालेय कबड्डी स्पर्धेमध्ये एन डी विद्यालय जामगाव या संघाने राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला . या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळी करत जामगाव संघाने प्रथम क्रमांक मिळवूनू उदया होणा-या ६ ते ९ डिसेंबर रोजी हरियाणा येथे होणाऱ्या १९ वर्षे खालिल शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघामध्ये सलग दुसऱ्यांदा सागर अनिल जगदाळे यांची महाराष्ट्र संघामध्ये निवड झाली आहे तचेच या स्पर्धेसाठी महाराष्ट्रा संघांचे संघ व्यवस्थापक म्हणून अनिल जगदाळे यांची निवड करण्यात आली आहे सागर जगदाळे व अनिल जगदाळे या दोघा पिता-पुत्रांच्या निवडी झाल्याबद्दल त्यांना पुढील स्पर्धेत यश संपादन करण्यासाठी नवनिर्वाचित आमदार सुरेश आण्णा धस आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग प्राचार्य सुर्यकांत मोकाशे सर कीशोर नाना हंबर्डे माझी सभापती बद्रीनाथ जगताप आधी सह मित्रपरिवार शिक्षक वृंदांनी त्यांना शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे.

## जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती रॅली

अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील जनऔषध शास्त्र विभागांतर्गत यु.एच.टी.सी.चनई व सांडेश्वरी विद्यालय, चनई यांच्या वतीने सोमवार (२ डिसेंबर) रोजी जागतिक एड्स दिनानिमीत्ताने जनजागृतीसाठी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांसाठी एड्स विषयावर प्रश्न मंजुषा स्पर्धा घेण्यात आली.

या कार्यक्रमासाठी अधिष्ठात डॉ. शंकर धपाटे, जनऔषध वैद्यक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. गणेश सिरसुलवार,




डॉ. अन्नु वरगीस, डॉ. विनोद शिंदे, डॉ. रुकसार मोमीन, डॉ. सुमेध माणीकपुरे, डॉ. कामरान सय्यद, समाजसेवा अधिक्षक अशोक वाघोळे हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. या प्रश्नमंजुषा स्पर्धेत सांडेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक स्वामी प्रणव, सहशिक्षक रितेश बोकस, प्रदिप चव्हाण यांनी परिश्रम घेतले.एड्स आजाराविषयी गैरसमज दुर व्हावेत एड्स या आजारातुन समाजाला मुक्त होण्याकरिता व या आजाराविषयी गैरसमज दुर होण्यास या कार्यक्रमाची मदत होईल. अशा कार्यक्रमांचे आयोजन स्वंयसेवी संस्था, सामाजिक संस्थांकडून झाल्यास ह्या आजाराचे समुळ नष्ट करण्यास मदत होईल. -डॉ. शंकर धपाटे, अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अंबाजोगाई

## आ.सुरेश धस यांना कबीनेट मंत्री करा-किशोर अडागळे

पाटोदा। प्रतिनिधी



विधान सभेच्या निवडणुकीत भाजप महायुतीने मोठे यश मिळविले आहे.यामध्ये आष्टी,पाटोदा,शिरुर विधानसभा मतदार संघातुन माजी मंत्री सुरेश धस यांनी ७८ हजाराच्या फरकाने दणदणीत विजय संपादन केला आहे.आ.सुरेश धस यांनी यापूर्वी तीन वेळा विधानसभेचे नेतृत्व केलेले आहे.एक वेळा बीड- लातुर-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधान परिषदेचे आमदार म्हणुन काम केलेले आहे.त्यांच्याजवळ आमदारकीच्या चार टर्मचा दांडगा अनुभव आहे.त्यांचा जनसंपर्क सुद्धा खूप मोठा आहे.लोकशाही आघाडी सरकारच्या काळात त्यांनी महसूल व पुनर्वसनसह अनेक. खात्याचे राज्य मंत्रीपदसुद्धा भूषविले आहे.आ.सुरेश धस यांनी मंत्रिपदाच्या काळात अतिशय उत्तम असे काम केलेले आहे.

याच दरम्यान उत्तराखंडमध्ये आलेली पर परिस्थिती असो की,आष्टी मतदार संघात पडलेला दुष्काळ असो आ.सुरेश धस यांनी आपल्या कौशल्याचा वापर करून ही परिस्थिती उत्तमपणे हाताळलेल्या होती. मराठवाड्यातील ऊसतोड कामगारांचे प्रश्न असो की,पाणी प्रश्न हा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला प्रश्नसुद्धा आ.सुरेश धस यांनी वेळोवेळी पोटतिडकेने सभागृहात मांडलेला आहे.विशेष म्हणजे कोरोना महामारीच्या काळातसुद्धा महाराष्ट्रात सर्वात जास्त कोविड सेंटर आ.सुरेश धस यांनी चालविले आणि त्यातून हजारो लोकांना या महाभयंकर संकटातून वाचविले होते.

### बन्सीलालजी जेथलिया यांचे निधन



माजलगाव : शहरातील प्रतिष्ठित केमिस्ट व्यापारी राधेश्याम जेथलिया, वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित डॉ संजय व डॉ नितीन जेथलिया यांचे वडील बन्सीलालजी जेथलिया (वय ८३) यांचे बुधवार ४ डिसेंबर रोजी पहाटे वृद्धपकाळाने निधन झाले. बन्सीलालजी जेथलिया अतिशय धार्मिक वृतीचे व शिस्तीचे भोक्ते होते. शहरातील होलसेल केमिस्ट व्यापारी राधेश्याम जेथलिया,नामांकित डॉ संजय जेथलिया व डॉ नितीन जेथलिया यांचे ते वडील होते. वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांनी अंतिम श्वास घेतला.त्यांच्या पश्चात भाऊ, बहीण तीन मुले, एक मुलगी नातवंडे असा परिवार आहे.४ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता शहरतील राजस्थानी वैकुंठधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक, राजकीय पदाधिकारी, नगरसेवक, डॉक्टर, वकील, पत्रकार, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष महोत्सव दि ८ ते १५ डिसेंबर दरम्यान होणार

अंबाजोगाई

अंबाजोगाई शहराचे ग्रामदैवत येथील योगेश्वरी देवीचा रविवार (दि.८ ते १५) डिसेंबर या कालावधीत मार्गशीर्ष महोत्सव साजरा होणार आहे. या महोत्सवा दरम्यान रामायणाचार्य ह भ प रामराव ढोक महाराजांचे कीर्तन, अभंगवाणी, संगीत रजनी व भजनासह विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांची मोठी रेलचेल असणार आहे. तेव्हा या सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ माता श्री योगेश्वरी देवीच्या सर्व भक्तांनी घेण्याचे आवाहन देवल कमिटीचे अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे, उपाध्यक्ष राजकिशोर मोदी त्याचबरोबर सचिव प्रा अशोक लोमटे यांनी केले आहे.

अंबाजोगाई शहरासकटच राज्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष महोत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदाही हा मार्गशीर्ष महोत्सव साजरा करण्याची तयारी मंदिर प्रशासनाच्या वतीने मंदिर परिसरात सुरू आहे. रविवारी (दि.८) रोजी सकाळी १० वाजता वर्णी देऊन या मार्गशीर्ष महोत्सवाला प्रारंभ होईल. याच दिवशी सायंकाळी ७ ते रात्री १० यावेळेत सुप्रसिद्ध भारुडकार नंदेश उमाप पुणे यांच्या भारूडाचा कार्यक्रम होणार आहे. सोमवार (दि.९) रोजी सायंकाळी सात वाजता कु.अंजली व कु. नंदिनी गायकवाड यांच्या बहारदार अभंगवाणीचा कार्यक्रम संपन्न होईल. त्यानंतर मंगळवार व बुधवारी (दि. १० व ११) या दिवशी सायंकाळी ६ ते ८ यावेळेत दोनही दिवस रामायणाचार्य ह. भ. प. रामराव ढोक महाराज यांचे कीर्तन होणार आहे.

या शिवाय दररोज वाघ्या- मुरळी, प्रवचन व भजन व गायनाची संगीत मैफल रामणार आहे. दररोज अंबाजोगाई शहर व तालुका परिसरातील भजनी मंडळांचे विविध आध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. पौर्णिमेच्या दिवशी म्हणजेच रविवार (दि १५) रोजी सकाळी ८ वाजता देवीच्या सभामंडपात होमहवन होऊन दुपारी १२.३० वाजता पूर्णाहुती पडणार आहे. याच दिवशी सायंकाळी पाच वाजता मार्गशीर्ष पौर्णिमेनिमित्त योगेश्वरी देवीची पालखी मिरवणूक शहरातील नियोजित मार्गाने निघणार आहे. या कार्यक्रमास देवीच्या सर्व भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन देवल समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे, सचिव प्रा. अशोकराव लोमटे, उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, कोषाध्यक्ष शिरीष पांडे, प्रविण दामा, संजय भोसले यांच्यासह सर्व योगेश्वरी विश्वस्त मंडळांनी केले आहे.

### रुपचंद आभारे यांच्या वाढदिवसानिमित्य रक्तदान शिबिराचे आज आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील कोथरूळ व माजलगाव सज्याचे तलाठी रुपचंद आभारे यांच्या वाढदिवसानिमित्य मागील ५ वर्षापासुन दरवर्षी रक्तदान शिबीर व इतर सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले जाते.मागील पाच वर्षी अनुक्रमे सोन्नाथडी, सुरूमगाव, शुक्लतीर्थ लिमगाव,मोगरा, केसापुरी या ठिकाणी रक्तदान शिबीर घेतले गेले. रक्तदानामुळे दुसऱ्याचा जीव वाचविण्यास मदत होत असल्याने, रक्तदान हे जगातील सर्वश्रेष्ठ दान संबोधल्या जाते.तसेच रक्तदात्यांनी रक्त दिल्यावर त्याच्या शरीरात नवीन शुद्ध रक्त तयार होते जे कि शरीराला आवश्यक असते. तसेच आपण रक्त दिल्यावर आपल्या कुटुंब,नातेवाईक यांना रक्तपेढी मार्फत लवकर रक्त उपलब्ध होते.याच तत्वावर यावर्षी सुद्धा आज दि ०५ डिसेंबर गुरुवार रोजी शहरातील महात्मा फुले विद्यालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजनकरण्यात आले आहे. तरी सदर रक्तदात्यानी उत्स्फूर्तपणे या रक्तदान शिबिरांत सहभागी होऊन रक्तदान करावे,असे आवाहन सराफा असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष रामराजे रांजवण यांनी केले आहे.


### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, बीड यांच्या न्यायालयात सुनावणी नोटीस

क्र.२०२४/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंद/कावी. १४८८
दिनांक ३/१२/२०२४

**विषय :- जन्म-मृत्यू नोंद प्रस्ताव दाखल केल्याबाबत.**
**श्री सय्यद सफियोद्दिन सय्यद मेहराजोद्दीन**

संदर्भ :- १. भारत राजपत्र सी.जी.डी.एल.अ.(१२०८२०२३-२४८०४४ नवी दिल्ली शुक्रवार ऑगष्ट ११.२०२३ श्रावण शके २०.१९.४५ (शक) विधी व न्याय मंत्रालय (कायदा विभाग) यांचेकडील शासन आदेश निर्देश परिपत्रक व व्याप्ती निदेशान्वये या न्यायालयात प्रकरण चालविण्याचा अधिकार आहे. २. मा. जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश क्र २०२३/आरबी-डेस्क-१/पोल-१/जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-२०२३ दिनांक १३.१०.२०२३

उपरोक्त विषयी या न्यायालयात श्री/श्रीम अधिवक्ता/ॲड सुधीर डी.खाडे यां वकीलपत्रासह अर्जदार श्री/श्रीम सय्यद सफियोद्दीन सय्यद मेहराजोद्दीन आसेफ नगर बीड यांचे वतीने विषयासंदर्भात प्रास्ताव दाखल केला आहे

याद्वारे थोडक्यात असे की, श्री/श्रीम. सय्यद सफियोदिन सय्यद मेहराजोद्दीन यांची आपले कार्यालयाचे दप्तरी जन्माची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये अनुपलब्ध असलेबाबत आपले 'कायर्यालयातुन दिनांक ०८/१०/२०२४ रोजी प्रमाणपत्र दिले आहे. त्याअनुषंगाने आपले मार्फत हे जाहिरप्रगटन प्रसिध्द करुन सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांनी श्री/श्रीम. सय्यद सफियोदिन सय्यद मेहराजोद्दीन यांचे दिनांक ०७/०२/१९९१ रोजीची जन्मांची नोंद जन्म मृत्यु नोंदवहींमध्ये घेण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदत्तीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद दिनांक ०७/०२/१९९१ घेण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

सदरील नोटीस आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकवून पंचनामा प्रत या कार्यालयास सादर करावी. आज दिनांक ०३/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २०/१२/२०२४ ही आहे.

स्वाक्षरित
**तहसीलदार, बीड**


## ईश्वर लोहिया यांचेकडून वसतिगृहातील विद्यार्थीनींना ऊबदार ब्लॅन्केटचे वाटप

अंबाजोगाई

शहरातील योगेश्वरी शिक्षण संस्थेअंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहातील तीस गरीब विद्यार्थिनींना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा व्यापारी ईश्वर सेठ लोहिया यांनी ऊबदार ब्लँकेटचे वाटप केले. संस्था कार्यालयात मंगळवार दिनांक ३ डिसेंबर रोजी केलेल्या आयोजित आयोजित कार्यक्रमास योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, कार्यकारी उपाध्यक्ष ॲड. जगदीश चौसाळकर ,संचालक ॲड. कल्याणी विर्धे ,संचालक अंगद कराड, स्वप्निल लोहिया, राहुल तापडिया, मेजर एस पी कुलकर्णी, रवी मठपती यांची उपस्थिती होती.



सध्या कडाक्याची थंडी आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार व मऊ ब्लॅन्केटची आवश्यकता असते. योगेश्वरी शिक्षण संस्थेअंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या वसती गृहामध्ये तीस मुली शिक्षण घेत आहेत. त्यांची थंडीच्या दिवसांमध्ये सोय व्हावी. या उद्देशाने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा व्यापारी ईश्वरसेठ लोहिया यांनी उबदार ब्लँकेट देण्यासाठी पुढाकार घेतला.संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, ॲड. जगदीश चौसाळकर यांच्याकडे या ब्लँकेट सुपूर्द करण्यात आल्या. सदर उबदार ब्लँकेट विद्यार्थिनींना देण्यात येणार आहेत. संस्थेच्या वतीने ईश्वरसेठ लोहिया ,स्वप्निल लोहिया, राहुल तापडिया यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वेळोवेळी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या पाहिजेत. शक्य झाल्यास आर्थिक मदतही केली पाहिजे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे असे आवाहन ईश्वरसेठ लोहिया यांनी सत्कारास उत्तर देताना केले. गणपत व्यास गुरुजी, ॲड. जगदीश चौसाळकर यांनी आपले मत व्यक्त करून लोहिया यांनी केलेल्या मदतीबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सेवानिवृत्त प्राध्यापक गणेश पिंगळे यांनी व्यक्त केले.

# बीडच्या तरूणाईत प्रतिकूल परिस्थितीला अनुकूल करण्याची क्षमता-आदित्य जीवने

बीड । प्रतिनिधी

बीडच्या युवांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. प्रतिकुल परिस्थतितीतही ते अनुकुल परिस्थिती निर्माण करू शकतात. या क्षमतेचा, कलागुणांचा युवकांना त्यांच्या जीवनात फायदा होतोच. युवा महोत्सवातून अशा गुणवत्ता, क्षमतेला वाव मिळतो. त्यातूनच उज्ज्वल देश घडण्यासाठी मदत होते, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी केले.

जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजन यांच्यावतीने आयोजित दोन दिवसीय जिल्हा युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी श्री. जीवने बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रपती पुरस्कारार्थी डॉ.सतीश साळुंखे, शिवछत्रपती पुरस्कारार्थी जे.पी.शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा युवा अधिकारी अरूणा कोचुरे, प्र. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, राज्य तायक्वाँदो असोसिएशनचे अध्यक्ष अविनाश बारगजे, राज्य युवक पुरस्कारार्थी तत्वशील कांबळे, ज्येष्ठ क्रीडा संघटक दिनकर थोरात, साने गुरूजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या श्रीमती डॉ. कविता कराड आदींची उपस्थिती होती.

युवा महोत्सवात सहभागी स्पर्धकांच्या कलागुणांना परीक्षकांनी योग्य वाव द्यावा. राष्ट्रीय एकात्मता वृद्धींगत होण्यासाठी युवांमध्ये प्रेरणा निर्माण करावी, असे



दोन दिवसीय जिल्हा युवा महोत्सवाचे थाटात उद्घाटन

आवाहनही श्री. जीवने यांनी यावेळी केले.

जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राचा इतिहास व विकास यावर उपस्थितांना श्री. शेळके, डॉ.साळुंके यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय एकात्मतेचे बीज रूजविण्यासाठी युवा महोत्सव अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात, असेही त्यांनी भाषणातून सांगितले. प्रास्ताविक श्री. विद्यागर यांनी केले. यामध्ये त्यांनी शासनाचा युवा महोत्सवामागील उद्देश आणि दोन दिवसांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा याबाबत सविस्तर माहिती दिली. सुरूवातीला नटराज मूर्तीचे पूजन, त्यानंतर दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते झाले. साक्षी कराड आणि काव्या डोंगरे यांच्या नृत्य कलेने कार्यक्रमाचा समारोप झाला. आभार श्रीमती कोचुरे यांनी मानले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून अरूण दैतकार, दीपक जमदाडे, विलास सोनवणे, राम गव्हाणे, डॉ. केशव भागवत, संतोष मस्के, प्रा. श्रीकांत पुरी, राधाकृष्ण वाघ, सुमित गायकवाड, लक्ष्मीकांत दोडके, डॉ. संजय कांबळे, रोहिणी धारमोडे, पूनम वोहरी, संदीप परदेशी, राजेंद्र इंगळे काम पाहणार आहेत. त्यांचाही यावेळी आयोजकांच्यावतीने पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.महोत्सव यशस्वीतेसाठी तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसुरकर, रेवननाथ शेलार, सतीश राठोड, अविनाशा पाटील, कार्यालय अधीक्षक धनेश करांडे, त्रिगुणा वाघमोडे, क्रीडा संयोजक जितेंद आराक, सचिन जाधव , किशोर काळे , मंगेश वडमारे, राजेश बागलाने आदी पुढाकार घेत आहेत.



**बीड : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक जवळील कल्याण पिंगळे दाजी मॉल येथे आज ''तनिष्का सिनेमाज'' चा भव्य शुभारंभ ह.भ.प. श्री. महादेव महाराज(मठाधिपती, श्रीक्षेत्र चाकरवाडी संस्थान) यांच्या शुभ हस्ते व माजीआमदार सुनिल दादा धांडे यांच्या उपस्थितीत पार पडला...शेतकरी मित्र तथा राष्ट्रवादी काँग्रेस,शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेंद्र मस्के यांनी भेट देऊन पिंगळे परिवारास शुभेच्छा दिल्या.**

# पाटोदा आणि शिरूर (का)तालुक्यात शेतकऱ्यांनी शासकीय सोयाबीन हमीभाव विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी करावी -सभापती किरण पाटील

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की आपले सोयाबीन धान शासकीय हमीभाव केंद्रावर विक्री करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्यात यावी नोंदणी दिनांक १५ डिसेंबर पर्यंत सुरू आहे.

लोकनेते आ.सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नातून कृषी उत्पन्न बाजार समिती पाटोदा मार्फत नाफेड अंतर्गत दि महाराष्ट्र स्टेट को ऑफ मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड मुंबई व महाकिसान संघ कृषी प्रोडूसर कंपनी लिमिटेड च्या माध्यमातून पाटोदा तालुक्यामध्ये पाटोदा, वैद्यकीनी आणि कुसळंब या तीन ठिकाणी तसेच शिरूर कासार तालुक्यामध्ये शिरूर आणि नागरेवाडी या दोन ठिकाणी सोयाबीन शासकीय हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील यांनी दिली.



पाटोदा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सोयाबीन या तेल वर्गीय पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते चालू वर्षी पाटोदा तालुक्यामध्ये ४९३१४ हेक्टर आणि शिरूर कासार तालुक्यामध्ये ५९५० हेक्टर क्षेत्रामध्ये सोयाबीनचा पेरा झाला असून उत्पन्न बऱ्यापैकी आहे परंतु दोन वर्षापासून तालुक्यातील शेतकऱ्यांनी सोयाबीन कमी भाव असल्यामुळे विक्री केली नाही याचा परिणाम तालुक्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरामध्ये सोयाबीनच्या थाप्या पडलेल्या दिसत असून घरामध्ये बसण्यासाठी देखील जागा शिल्लक नाही या गोष्टीमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन या मालाला योग्य भाव मिळावा यासाठी लोकनेते आ.सुरेश आण्णा धस यांनी विशेष प्रयत्न करून पाटोदा तालुक्यामध्ये तिन आणि शिरूर तालुक्यामध्ये दोन अशी पाच शासकीय हमीभाव केंद्र सुरू केली आहेत त्याची प्रत्यक्ष खरेदी सुरू करण्यात आली आहे यासाठी सोयाबीनची ऑनलाईन नोंदणी सुरू असून नोंदणी १५ डिसेंबर पर्यंत चालू राहील या दरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या सोयाबीन ची ऑनलाईन नोंदणी करण्यात यावी. या शासकीय हमीभाव केंद्रावर ४८९२/- रुपये प्रतिक्विंटल सोयाबीनचे दर मिळणार असून यासाठी शेतकऱ्यांनी २०२४-२५ या वर्षीचा सोयाबीन पेरा नोंदणी असलेला सात बारा,आठ अ चा उतारा,आधार कार्ड ची झेरॉक्स तसेच राष्ट्रीयकृत बँकेचे खाते पुस्तकाचे झेरॉक्स प्रत. घेऊन खालील मोबाईल नंबर ला संपर्क करा कुसळंब-९४२०१६२१६८(गर्जे सागर),पाटोदा-९९७५५११३२२(वीर प्रकाश),शिरूर कासार-९४२३१६८७५५(शिवाजी बडे),नागरेवाडी (शिरूर)-९७६३२५३५४६(अशोक खेडकर) या नंबरला संपर्क करून आपली नोंदणी करून घ्यावी नोंदणी १५ डिसेंबर पर्यंत चालू राहील असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती पाटोदा चे सभापती किरण शिंदे पाटील यांनी केले आहे.

# प्लॅस्टिक मुक्त वडवणी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ वडवणी यांच्याकडून कापडी पिशवीचे वाटप

वडवणी । प्रतिनिधी

आजकाल जागोजागी पसरलेल्या कचऱ्यामध्ये सर्वात मोठ्या प्रमाणावर दिसणारा घटक म्हणजे प्लास्टिक हा आहे प्लास्टिकचा कचरा आरोग्यासाठी खूप घातक आहे त्यामुळे आपण सर्वांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करता कापडी पेशव्यांचा वापर करावा कापडी पिशवी वापरू आरोग्य सांभाळू हा संदेश देण्यासाठी व प्लास्टिक मुक्त वडवणी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ वडवणीच्या वतीने मंगळवार दि.०३ डिसेंबर २०२४ रोजी माध्यमिक विद्यालय वडवणी शाळेतील विद्यार्थी व





रोटरी क्लब ऑफ वडवणी यांच्या वतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते या रॅलीचा वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून प्रारंभ करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंत रॅली काढण्यात आली या रॅलीत प्लॅस्टिक वापराचे दुष्परिणाम यावर संदेश व नारे देण्यात आले. आंबेडकर चौक या ठिकाणी रोटरी क्लब ऑफ वडवणी यांच्याकडून कापडी पिशवीचे वाटप करून रॅलीची सांगता करण्यात आली.

प्लास्टिक मुक्त वडवणी करण्यासाठी काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये रोटरी क्लब ऑफ वडवणीचे अध्यक्ष ज्ञानदेव जिजा आंधळे,सचिव भैरवनाथ शिंदे सर,या कार्यक्रमाचे प्रोजेक्टचेअरमन जयदेव लांडे सर,को.चेअरमन संतोष गोंडे सर तसेच रोटरी क्लब ऑफ वडवणीचे माजी तालुकाध्यक्ष डॉ.पूर्भे साहेब,डॉ.मुंडे साहेब,रो. किसन भाऊ माने रो.वशिष्ठ नाना शेंडगे,रो.गोविंद तात्या आंधळे रो.गोरख भाऊ आळणे सर्व रोटेरियन पदाधिकारी उपस्थित होते. रोटरी क्लब ऑफ वडवणी यांच्या वतीने आयोजित केलेल्या या स्तुत्य उपक्रमाची सर्वत्र चर्चा होत आहे.

# मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचा सन्मान

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील नागरिकांनी लोकशाही मूल्यांची जाणीव ठेवत मतदान प्रक्रियेत उत्स्फुर्तपणे सक्रिय सहभाग घेतला, ही कौतुकास्पद बाब आहे. सामाजिक संस्थांपासून व्यापारी महासंघापर्यंत सर्वांनी एकत्र येत लोकशाही मजबूत करण्याचे कार्य केले, त्यामुळेच मतदानाच्या टक्केवारीत जालना जिल्हा मराठवाड्यात प्रथम तर राज्यात तिसऱ्या स्थानावर राहिला, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज (दि. ४) रोजी येथे केले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत जालना जिल्ह्याने मतदानाच्या उच्च टक्केवारीत



महाराष्ट्रात तृतीय आणि मराठवाड्यात पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचा कॅट अंतर्गत व्यापारी महासंघ जिल्हा जालना यांच्यावतीने विशेष सन्मान करण्यात आला, त्यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. पांचाळ बोलत होते. ते पुढे म्हणाले की, हा पुरस्कार माझ्यासाठी नव्हे, तर जिल्ह्याच्या प्रत्येक नागरिकासाठी आहे. यापुढेही आपण असेच संघटित राहून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करत राहू. सन्मान पत्राचे वाचन सतीश पंच यांनी केले. सन्मान सोहळ्याचा उद्देश विषद करताना ते म्हणाले की, व्यापारी महासंघाने जालना जिल्ह्याच्या नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उल्लेखनीय मतदानासाठी कौतुक करण्यासाठीचा हा सन्मान सोहळा आहे. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी पुढील काळात सामूहिक प्रयत्न करण्याचा संकल्प आपण सर्व मिळून करूयात, अशी साद त्यांनी घातली. कॅटचे मराठवाडा अध्यक्ष हस्तीमल बंब यांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करणारे जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ, जिल्ह्यातील व्यापारी आणि नागरिकांचे आभार मानले आणि व्यापारी महासंघाची लोकशाहीसाठी बांधिलकी अधोरेखित केली.

# माजलगाव तालुका व शहर कार्यकारिणी करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी कडून मुलाखतीचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या आहेत या निवडणुका वंचित बहुजन आघाडीने पूर्ण ताकतीने लढवल्या आहेत बीड जिल्ह्यातील येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तसेच तालुक्यातील पक्षीय संघटन आणखीन जोमाने वाढवण्यासाठी वंचित बहुजन आघाडी च्या वतीने दि. ८/१२/२४ वार रविवार दुपारी १२ वाजता माजलगाव येथील शासकीय विश्रामगृह या ठिकाणी मुलाखतीचे आयोजन केले आहे तरी माजलगाव तालुक्यातील पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी अ‍ॅड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे राजकीय हात बळकट करण्यासाठी तसेच वंचित बहुजन आघाडी या पक्षाची भूमिका तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी मुलाखतीस उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे बीड पश्चिम जिल्हा अध्यक्ष अजय सरवदे यांनी केले आहे



# अंबाजोगाईत साडेदहा लाखांचा गुटखा पकडला



## शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; दोघे ताब्यात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात गुटख्याच्या गोदामावर मंगळवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास धाड मारली. यात १० लाख ६७ हजार रूपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. गणेश बिडवे, किरण रविंद्र शेटे या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

त्यांनी अंबाजोगाई शहरातील गणेश प्रोव्हिजनच्या गोदामात गुटख्याचा साठा करुन ठेवला होता. याची माहिती बाळराजे दराडे यांना मिळाली. त्यांनी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या आदेशाने या गोदामावर धाड टाकली.

◀◀ पान ३ वर

# माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनच्या तालुका अध्यक्षपदी दिपक घायाळ यांची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते व बहुजन विकास मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष दिपक घायाळ यांची माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनच्या तालुका अध्यक्षपदी निवड झाली आहे.

तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते व बहुजन विकास मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष दिपक घायाळ यांचे सामाजिक,राजकीय कार्यात ते अग्रेसर असतात.ते गेली वीस वर्षापासुन कार्यात सहभागी असल्यामुळे त्यांच्या या



कार्याची दखल घेऊन संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांचे आदेशाने त्यांची नियुक्ती ही दिनांक १७/०९/२०२४ पासून पुढील तीन वर्ष किंवा पुढील आदेश येईपर्यंत लागू राहिल.असे आशयाचे पत्र दिले आहे. सदर आपणास दिलेले पद हे मानद स्वरूपांचे असून आपणांस भारतीय संविधान,भारतीय कायदे व आपल्या माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनची आचारसंहिता यांचे काटेकोर पालन करावयाचे आहे. आपण सदर पदावर राहून माहिती अधिकार अधिनियम २००५ चा व्यापक जनहितासाठी वापर करावा.तसेच सर्व सामान्य नागरिकांमध्ये


◀◀ पान ३ वर

# ईव्हीएम विरोधात आंदोलन करू नये भाई थावरेंना पोलिसांचा मज्जाव

माजलगाव । प्रतिनिधी

ईव्हीएम च्या विरोधात आंदोलन करू नये म्हणून येथील शहर पोलीस स्टेशनने भाई थावरे यांना सी.आर.पी.सी.१६८ च्या नोटीसद्वारे मज्जाव केला आहे.

भाई गंगाभिषण थावरे यांना माजलगाव शहर पोलीसांनी कलम १६८ नुसार दिलेल्या नोटीसीत असे नमूद केले आहे की, आपण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकमध्ये मोठ्या प्रमाणावर



मशीन मध्ये फेर फार करुन निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होऊन जनतेच्या मनाचा अनादर करण्यात आला आहे तरी बीड व माजलगाव विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या भावना आहेत की मशीनवर निवडणुका न घेता बैलेट पेपरवर घेण्यात यावा या मागणीसाठी दिनांक ०५ डिसेंबर गुरुवार रोजी सकाळी ११:०० वाजता माजलगाव शहरातील जुना मोंढा येथील राष्ट्रवादी कोंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष जनसंपर्क कार्यालय ते छ. शिवाजी महाराज चौक अशी मशीनची प्रेत यात्रा काढणार आहात. सदरची मशीन प्रेत यात्रेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन सार्वजणीक शांतेचा भंग होण्याची शक्यता आहे त्यामुळे आपण आपली मागणी हि निवडणुक विभागशी पाठपुरावा करुन पुर्ण करुन घ्यावी, व दिनांक ०५ डिसेंबर गुरुवार रोजी माजलगाव शहरात आपली मशीन प्रेत यात्रा काढु नये..

◀◀ पान ३ वर

# गटनेतेपदी फडणवीस यांची निवड; आष्टीत जल्लोष

**आष्टी । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला नेत्र दीपक यश मिळाल्यानंतर सत्ता कधी स्थापन होणार याची उत्सुकता अवघ्या महाराष्ट्रभरातील सर्व भारतीय जनता पार्टीच्या शिवसेनेच्या व अजित पवार गट राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना होती सत्ता स्थापनेकडे महाराष्ट्राचे सर्व जनता डोळे लावून बसली होती एवढे मोठे बहुमत जनतेने दिलेले असताना देखील सत्ता स्थापनेला एवढा विलंब कशामुळे अशा अनेक चर्चा चर्चिली जात होत्या. मात्र या सर्व गोष्टीला आज ४



तारखेला विधिमंडळ गटनेतेपदी माजी मुख्यमंत्री तथा नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड झाल्यानंतर सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. व आज दुपारी देवेंद्र गंगाधर फडवणीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीमध्ये मुंबई

◀◀ पान ३ वर

# महादेव बादाडे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

वाघोरा (ता. माजलगाव) येथील शेतकरी महादेव रंगराव बादाडे (वय, ६० वर्ष) यांचे मंगळवारी (ता. तीन) रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी (ता. चार) वाघोरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना नातवंड असा परिवार आहे. सार्वजनीक बांधकाम विभागातील शाखा अभियंता धनंजय बादाडे, मनोज बादाडे यांचे ते वडील होत.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...


पुणे विशेष

गुरुवार, दि.०५ डिसेंबर २०२४ | पान ७

# कुमार महाराष्ट्र केसरी विक्रम पारखी यांचा हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

कुस्तीच्या आखड्यात शड्डू ठोकणार, मैदानात भल्याभल्यांना चितपट करणारा पैलवान विक्रम पारखी थोड्याच दिवसाच लगीन गाठ बांधणार होता. अंगाला हळद लागण्याची तारीखही ठरली होती. मात्र, नियतीला हे मान्य नव्हतं. कुमार महाराष्ट्र केसरीसह राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर मुळशीचे नाव करणारा विक्रम बुधवारी (दि.१२) नेहमी प्रमाणे व्यायामाला गेला. पण त्याच वेळी त्याला हृदयविकाराचा झटका आला, यातच त्याचा मृत्यू झालाय. त्यामुळे अंगाला हळद लावण्याची तयारी सुरु असतानाच विक्रमचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू



## कुस्तीक्षेत्रासह मुळशीवर शोककळा

झाला. विक्रमच्या जाण्याने कुस्तीक्षेत्रासह मुळशीवर शोककळा पसरली आहे.

हृदय विकाराचा झटका आल्यानंतर काही क्षणात विक्रमने अखेरचा श्वास घेतला. विक्रम मुळशीतील माण या गावचा कुस्ती क्षेत्रात मेहनत आणि कसरत घेत नाव कमावलेल्या पैलवानाने वयाच्या तिशीतच जगाचा निरोप घेतला. विक्रमचा १२ डिसेंबर रोजी विवाह होणार होता, मात्र संसाराच्या आखाड्यात उतरण्यापूर्वीच तो आयुष्याच्या आखाड्यातच चितपट झाला. विक्रमने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर शड्डू ठोकत अनेक किताब पटकावले होते. पुढंही अनेक आखाडे गाजविण्याची क्षमता विक्रममध्ये होती, मात्र नियतीला काही हे मान्य नव्हतं. अनेक पैलवानांना चितपट करणाऱ्या विक्रमला हृदयविकाराच्या झटक्याने गाठले अन् यातच त्याचा मृत्यू झाला. त्याच्या अचानक जाण्याने सर्व मुळशी तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

महाराष्ट्र राज्य कुमार अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत अजिंक्यपद...

मुळशीचा भूमिपुत्र असलेल्या पैलवान विक्रम पारखी याने कुमार महाराष्ट्र केसरी पदावर आपले नाव कोरून मानाची गदा मिळवण्याचा पराक्रम केला होता. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद द्वारे २०१४ साली वारजे येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य कुमार अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत विक्रमने अजिंक्यपद मिळवले होते. या शिवाय विक्रमने अनेक राष्ट्रीय पदके आणि किताब पटकावले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील कुस्ती स्पर्धेत सहभाग घेतला होता. हिंदकेसरी पैलवान अमोल बुचडे आणि विक्रम पारखीचे गुरू-शिष्याचे नाते होते. विक्रमचे वडील शिवाजीराव पारखी हे निवृत्त सैनिक असून त्यांनी १९९९ च्या कारगिल युद्धात लढा दिला होता. लष्करात राहून वडिलांनी देशाची सेवा केली आहे.

# कात्रज तलावातील गाळ काढणार; महापालिकेने केला



पुणे । प्रतिनिधी

महापालिकेच्या कात्रज येथील स्वर्गीय राजीव गांधी प्राणी संग्रहालयाच्या परिसरात असलेल्या तलावातील सर्व पाणी सोडण्यात आले आहे. महापालिकेकडून शहरीपूर व्यवस्थापन प्रणाली अंतर्गत या तलावाची खोली वाढविण्यात येणार असून त्यासाठी या तलावातील गाळ काढला जाणार आहे. हे काम पाटबंधारे विभागाच्या मदतीने केले जाणार असल्याची माहिती महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे प्रमुख मंगेश दिघे यांनी दिली.

या तलावातून सोडण्यात आलेले पाणी आंबील ओढ्याच्या माध्यमातून मुठा नदीस मिळते. २०१९ मध्ये हा तलावपूर्ण भरला होता, त्यानंतर त्यातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले होते. त्यामुळे आंबील ओढ्याला पूरस्थिती उद्भवली होती. या शिवाय, या तलावात मोठ्या प्रमाणात आसपासचे सांडपाणी येत असल्याने या तलावात जलपर्णी मोठ्या प्रमाणात फोफावत असून त्याचा फटका या भागातील जैव विविधतेला बसत आहे.

त्यामुळे तलावात येणारे सांडपाणी बंद करून या ठिकाणी महापालिकेकडून दोन एमएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यासोबतच आता गाळही काढला जाणार आहे. त्यामुळे तलावाची पावसाळ्यातील पाणी साठवण क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच, सांडपाणीही बंद होणार असल्याने तलावाला पुन्हा गतवैभव मिळणार आहे.

# तरुणाचा चोर समजून केलेल्या मारहाणीत मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात पेट्रोल चोरीच्या संशयावरून केलेल्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पेट्रोल चोरल्याचा संशयावरून तरूणाला बेदम मारहाण करण्यात आली. यामध्ये तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना नऱ्हे परिसरात घडली आहे. बेदम मारहाण केल्याने तरूणाला उपचारांसाठी रूग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, त्या दरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. समर्थ भगत असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे.

घटनेप्रकरणी मृत तरुणाचे वडील नेताजी भगत यांनी सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात (ड्ढीपिश झेश्रळलश) फिर्याद दिली आहे. या प्रकरणी चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी गौरव कुटे, अजिंक्य गांडले आणि राहुल लोहार या संशयितांना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नऱ्हे येथील मानाजीनगर भागात २५ नोव्हेंबर रोजी सकाळी सहाच्या सुमारास माजी उपसरपंच सुशांत कुटे यांच्या कार्यालयासमोर समर्थ हा गाडीतील पेट्रोल संपल्याने तो दुसऱ्या गाडीतील पेट्रोल काढत होता. त्यावेळी गौरव कुटे आणि त्याच्या इतर दोन-तीन साथीदारांनी



समर्थला चोर समजून लाथाबुक्यांनी, काठी आणि सायकलच्या साखळीने बेदम मारहाण केली. त्यात गंभीर जखमी झाल्याने समर्थला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले, परंतु त्याचा रविवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

पेट्रोल चोरीच्या संशयावरून झालेल्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू (ड्ढीपिश ऊीळाश छश्रुी) झाला आहे. पेट्रोल चोरी केल्याच्या संशयावरून तरुणाला बेदम मारहाण केली होती. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. या उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. समर्थ भगत असं मृत तरुणाचं नाव आहे. याबाबत मृत तरुणाचे वडील नेताजी भगत यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या प्रकरणी चारजणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नऱ्हे येथील मानाजीनगर भागामध्ये २५ नोव्हेंबर रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास माजी उपसरपंच सुशांत कुटे यांच्या कार्यालयासमोर समर्थ हा गाडीतील पेट्रोल संपल्यामुळं दुसऱ्या गाडीतील पेट्रोल काढत होता. त्यावेळी गौरव कुटे आणि त्याच्या इतर दोन-तीन साथीदारांनी समर्थला पाहिलं. त्यानंतर समर्थला चोर समजून लाथाबुक्यांनी, काठी आणि सायकलच्या साखळीने बेदम मारहाण केली. या मारहाणीमध्ये समर्थ गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयामध्ये दाखल केले. पण उपचारादरम्यान रविवारी त्याचा मृत्यू झाला.

# चिडलेल्या पत्नीचा पतीवर हल्ला; मोड आलेले कडधान्य खाल्ल्यावरून मिक्सरच्या भांड्याने मारहाण

पुणे । प्रतिनिधी

पती व पत्नीत कौटुंबिक कारणावरून वादविवादाचे प्रसंग वारंवार घडतात. मात्र, पुण्यात एक वेगळ्याच कारणातून पत्नीने पतीला बेदम मारहाण करून जखमी केल्याचा प्रकार घडला. मोड आलेले हरभरे खाल्ल्याच्या कारणावरून पत्नीने पतीला लाटण्याने, तसेच डोक्यात मिक्सरचे भांडे मारून जखमी केले. याशिवाय हाताची करंगळी जोरात चावून नखही तोडले. याप्रकरणी पतीने पत्नीविरोधात थेट पोलिसांत तक्रार दिली आहे.

सोनाली अमोल सोनवणे (४०) असे पत्नीचे नाव असून, पीडित पती अमोल गुलाबराव सोनवणे (४४, रा. सोमवार पेठ, पुणे) याने समर्थ पोलिसांत तक्रार दिली आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार अमोल यांनी स्वयंपाकघरात मोड आलेले काही हरभरे खाल्ले. त्यावरून पत्नीने चिडून शिवीगाळ करत लाटण्याने मारहाण केली. नखांनी चेहऱ्यावर, गालावर, डाव्या कानाच्या पाठीमागे, पोटाला उजव्या बाजूस ओरखडून जखमी केले. अमोल यांनी लाटणे हिसकावून घेतल्यावर सोनाली यांनी मिक्सरचे भांडे उचलून पतीच्या डोक्यात दोनदा मारले. उजव्या हाताच्या करंगळीला चावा घेऊन दुखापत केली. घटनेची माहिती मिळताच समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी



केली.

पतीकडून पत्नीला मारहाण

दुसऱ्या घटनेत उत्तमनगर परिसरात पायगुडे चाळ येथे राहणाऱ्या एका कुटुंबातील ३२ वर्षीय पत्नीने पतीच्या रिक्षाचे हप्ते भरले. मात्र, हप्ते मला न सांगता का भरले, याचा राग धरून पतीने पत्नीला शिवीगाळ करत पोटावर लाथ मारून तिला खाली पाडले. याशिवाय लाटण्याने तिच्या डोक्यावर मारून दुखापत केली. याप्रकरणी पत्नीच्या तक्रारीनंतर उत्तमनगर पोलिसांनी पती इम्तियाज नजित कुरेशी (३६) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# कंटेनरच्या धडकेत दुचाकीवरील महिलेचा मृत्यू

मावळ । प्रतिनिधी

वडगावकडून चाकणकडे जाणाऱ्या भरधाव कंटेनरने दुचाकीस जोरदार धडक दिली. या झालेल्या अपघातात दुचाकीवर मागे बसलेल्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर दुचाकीस्वार पती जखमी झाला आहे. तळेगाव-चाकण महामार्गावर परुळेकर विद्यानिकेतन ते बुलेट शोरुम दरम्यान सोमवारी (दि. २) सकाळी पावणे अकराच्या सुमारास हा अपघात झाला.

उषा शांताराम काटकर (वय ४५, रा. नाणोली मावळ, टाकवे) असे मयत महिलेचे नाव असून तिचा पती शांताराम सबाजी काटकर (वय ५०, रा. नाणोली मावळ) हे अपघातात जखमी झाले आहेत. अपघतानंतर कंटेनरचालक बाळासाहेब नागरगोजे हा स्वत:हून पोलिसांकडे हजर झाला. पुढील तपास तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संदेश इंगळे करीत आहेत. तळेगाव-चाकण महामार्गाचे काम प्रलंबित आहे. त्यामुळे या रस्त्यावर अपघातांची मालिका सुरु असून आणखी किती बळी जाणार आहेत, असा संताप नागरिक व्यक्त करत आहेत.

# जुन्या भांडणाच्या रागातून अल्पवयीन मुलाचा खून

घोरपडी - वानवडी पोलिस ठाण्याअंतर्गत असलेल्या रामटेकडी परिसरात आज सकाळी सात वाजता जुन्या भांडणाच्या रागातून अल्पवयीन मुलाचा खून झाल्याची घटना रामटेकडी येथील जामा मस्जिद समोर घडली आहे. यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



यश सुनिल घाटे (वय-१७), अशोकभाऊ कांबळे ऑफीसच्या मागे, रामटेकडी) असे खून झालेल्या मुलाचे नाव असून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन साहील लतीफ शेख (वय-१८) व ताहीर खलील पठाण (वय-१८, राहणार स.नं. ११० रामटेकडी) या गुन्हेगारांना अटक केली आहे. मृत यश घाटेचा भाऊ प्रज्वल सुनील घाटे याने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. वानवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे यांनी दिलेल्या माहितीनुसार आज सकाळी सातच्या सुमारास यश घाटे व त्याचे मित्र आदित्य चव्हाण, रेहान पठाण, श्रेयस शिंदे हे रामटेकडी येथील जामा मस्जिद समोरून कॉलेजला जात असताना साहील व ताहीर यांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरुन यश घाटे याला कोयत्याने गंभीर जखमी करुन ठार मारले. पुढील तपास वानवडी पो. स्टे. चे पो. उ. निरिक्षक मुनीर इनामदार व दिलीप पालवे हे करत आहेत.

# स्वयंसाह्यता बचतगटसाठी सात कोटी निधी

पुणे । प्रतिनिधी

अल्पसंख्याक बहुल क्षेत्रामध्ये महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या स्वयंसाह्यता बचतगट योजनेच्या २०२४- २५ आर्थिक वर्षासाठी ७ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यास अल्पसंख्याक विकास विभागाने मान्यता दिली आहे.

राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या लोकसमूहातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांना संघटित करून पुरेसा पतपुरवठा उपलब्ध करून देणे व त्यांना उद्योजकतेविषयक आवश्यक असलेली माहिती देऊन त्यांच्यामध्ये उद्योजकीय कौशल्ये विकसित करण्यासाठी अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांचे स्वयंससाह्यता बचतगट स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याअंतर्गत पहिल्या टप्प्यात मुंबई शहर, मुंबई उपनगर,



नांदेड, मालेगाव, कारंजा, परभणी, पुणे, नागपूर, औरंगाबाद, भिवंडी, मुंब्रा-कौसा आणि मिरज येथे अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांचे स्वयंसाह्यता बचतगट स्थापन करण्यात येणार आहेत. या योजनेंतर्गत अल्पसंख्याक महिलांचे २ हजार ४०० बचत गट निर्माण करून त्यांचे १३ लोकसंचालित साधन केंद्रे ८ वर्षांच्या कालावधीत उभी राहणार आहेत.

महिला आर्थिक विकास महामंडळाने ३१ मार्च २०२० या ८ वर्षांच्या कालावधीत ३२०० बचतगट व ८ लोकसंचालित साधन केंद्राची स्थापना केली आहे. योजनेचा कालावधी संपुष्टात आल्याने योजनेस १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२५ या पाच वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. योजनेंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करून महिला आर्थिक विकास महामंडळाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात या ३ कोटी ८३ कोटी इतका निधी वितरीत करण्याची विनंती केली होती. त्यास मंजुरीही मिळाली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात स्वयंसाह्यता बचतगटासाठी सहायक अनुदान या योजनेसाठी एकूण ७ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत योजनेच्या अर्थसंकल्पित निधीच्या ६० टक्के मर्यादेपर्यंत निधी वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. उपयोगिता प्रमाणपत्र महिला आर्थिक विकास महामंडळाने शासनास सादर करणे आवश्यक राहील. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत याबाबतच्या वर्षनिहाय खर्चाचा लेखाविषयक तपशील ठेवावा लागणार आहे. ज्या बाबींसाठी अनुदान वितरित करण्यात आले आहे, त्या बाबींवरच खर्च करण्याचेही बंधन घालण्यात आले आहे.

# दिव्यांग दिनानिमित्त तालुका स्तरीय प्रेरणा पुरस्काराचे वितरण

शिरूर : दिव्यांग दिनानिमित्त रामलिंग महिला उन्नती बहु सामाजिक संस्थेच्या वतीने तालुका स्तरीय प्रेरणा पुरस्कार हा समाजात स्वतः दिव्यांग असून सुद्धा समाजाचे देणे लागतो या भावनेतून ते सामाजिक कार्य करत असतात.



सामाजिक कार्यात नेहमीच चांगला सहभाग असलेले पांडुरंग शंकर डोके यांना या वर्षीचा तालुका स्तरीय प्रेरणा पुरस्कार हा शिरूर हवेलीचे माजी आमदार अशोक बापू पवार, पोलिस उपविभागीय आधिकारी प्रशांत ढोले यांच्या हस्ते ट्रॉफी आणि शाल-श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. समाजात अनेक दिव्यांग हे स्वतःचे काम स्वतः करून समाजासाठी ही कार्य करत असतात. यांना प्रेरणा मिळावी म्हणून ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. यावेळी मुज्जुफर कुरेशी, रवींद्र खांडरे, मंगेश खांडरे, शरद पवार, केशव शिंदे, सागर नरवडे, युवराज सोनार, योगेश पवार, गिता आढाव व अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांचे आभार रामलिंग महिला उन्नती बहु सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा राणी कर्डिले यांनी मानले.

# शोषितांचे नाटक (Theater of the oppressed) एक अत्यंत प्रभावी माध्यम

आरोग्य चळवळीचे मुद्दे जास्तीत जास्त लोकांपर्यंत अधिक प्रभावी पद्धतीने कसे पोहचवता येईल याबाबत डॉ. अभय यांच्यासोबत सातत्याने चर्चा सुरू असते. सोशल मीडियावर लांबलचक लिहलेले लोक फारसे वाचत नाहीत. मग एक एक मुद्दा घेऊन पोस्टर तयार करूया असे ठरले, त्यानुसार विधानसभा निवडणुकी दरम्यान एक पोस्टर मोहीम आम्ही राबवली. व्हिडीओ जास्त पाहिले जातात म्हणून ते करावेत याच्या ही चर्चा होत असतात.

दरम्यान पिंपरी चिंचवडच्या गांधी नगर वस्तीमध्ये एका संविधान परिषदेसाठी गेलो होतो. तिथे कृतार्थ, प्रियपाल यांच्या टीमने (शोषितांचे नाटक) सादर केले. वस्तीतील प्रश्नांना घेऊन हे नाटक होते. यातला खरा मुख्य भाग म्हणजे हे नाटक शेवटी प्रेक्षकांनी येऊन पूर्ण करायचे असा होता. त्यामध्ये लोकांच्या प्रश्नांवरची खरी उत्तरे काय आहेत हे ते लोकच स्टेजवर येऊन मांडतात आणि नाटक संपते.

हे नाटक पाहून मी खूप प्रभावित झालो. चळवळीचे मुद्दे लोकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी हे निश्चित एक प्रभावी माध्यम ठरू शकेल असे तीव्रतेने वाटले. मग शोध सुरू झाला या माध्यमाची अधिक माहिती मिळवण्याचा. ब्राझिलियन नाटककार ऑगस्टो बोल हा या नाटक प्रकारचा निर्माता. भारतात हिमाचल प्रदेश येथील संभावना इन्स्टिट्यूटमध्ये या प्रकारचे नाटक कसे करावे याबाबतचे वर्कशॉप घेतले जाते. मुख्य म्हणजे हे नाटक करण्यासाठी तुम्हांला अभियन करता आलाच पाहिजे असे नाही. केवळ तुम्हांला ज्या विषयावर, प्रश्नावर नाटक करायचे आहे, त्याची समज चांगली असेल म्हणजे झाले कृतार्थ, प्रियपाल या मित्रांनी याबाबतची माहिती मिळवण्यासाठी खूप मदत केली. कधी एकदा हिमाचलला जातो आणि हा नाटक प्रकार मुळातून समजून घेतो असे झाले होते.

नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात याबाबतचे वर्कशॉप असल्याचे समजले, तातडीने त्यासाठी अर्ज वगैरे करण्याची प्रक्रिया पार पडली. माझा यातला उत्साह व जाणून घेण्याची इच्छा पाहून संयोजकांनी छोटी स्कॉलरशिप देऊन या वर्कशॉपसाठी निवड केली. विधानसभा निवडणुकीत आरोग्य हा राजकीय मुद्दा बनावा यासाठी जन आरोग्य अभियानाच्या माध्यमातून आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यानंतर लागलेला निकाल हा खूपच धक्का देणारा होता. हा धक्का पचवून, निवडणुकीचे सर्व विचार बाजूला ठेवून २४ नोव्हेंबर २०२४ ला झेलम एक्सप्रेसमध्ये बसलो. दोन रात्र व एक संपूर्ण दिवस असा ३६ तासांचा प्रवास करून पठाणकोट स्टेशनवर उतरलो. तिथून बसने पालमपूर (हिमाचल प्रदेश) गाठले. अत्यंत निसर्गरम्य अशा ठिकाणी वसलेल्या संभावना इन्स्टिट्यूटमध्ये हे वर्कशॉप होते. केवळ ज्यांना अभियन करता येतो त्यांनीच नाटक करायचे असते हा इलिट एप्रोच इथे तुमच्या डोक्यातून पहिल्यांदा काढून टाकला जातो. अगदी कोणीही नाटक करू शकते. शोषितांचे प्रश्न सोडवण्याची उत्तरे कुणी तज्ज्ञांनी मांडण्यापेक्षा लोकांनीच ती एकत्र येऊन मांडावीत असे हे नाटक सांगते.

हा वर्कशॉप करण्यासाठी केरळ, तेलंगणा, दिल्ली, काश्मीर, पंजाब तसेच महाराष्ट्रातील मुंबई, नाशिक अशा विविध ठिकाणांहून मित्र-मैत्रिणी आले होते. एक नवे माध्यम शिकून पुण्याला परतलो आहे. याविषयी वेळोवेळी आणखी लिहीत राहीन. मुख्य म्हणजे कृतार्थ, प्रियपाल, आशिष, अर्पिता, राहुल, अभिलाषा यांच्या मदतीने येणाऱ्या काळात हे नाटक महाराष्ट्रात सर्वदूर घेऊन जायचे आहे. गावात, वस्त्यांमध्ये, सोसायटच्या, चावडीवर, शाळा-कॉलेजमध्ये हे पोहचवायचे आहे.







# शिक्षणाधिकारी गवळी यांचा दिव्यांग शाळेत वाढदिवस साजरा



बारामती । प्रतिनिधी

कऱ्हावागज (ता. बारामती) येथील यशोदीप निवासी दिव्यांग विद्यालयाच्या मुलांसमवेत बारामती पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी नीलेश गवळी यांनी आपला वाढदिवस साजरा केला. यावेळी खाऊवाटप व फळवाटप करण्यात आले.

यशोदीप निवासी मूकबधिर विद्यालयात गटशिक्षणाधिकारी नीलेश गवळी यांनी आपला वाढदिवस मुलांसमवेत मोठ्या उत्साहात साजरा केला. पंधरा वर्षांपूर्वी लावलेले हे रोप म्हणजेच हे दिव्यांग विद्यालय. खरे म्हणजे विद्यालयाचा खडतर प्रवास संस्थापिका रामेश्वरी जाधव यांनी यानिमित्ताने सांगितला.

मुलांच्या चेहऱ्यावरील निरागस आनंद यावेळी सर्वांना अनुभवायला मिळाला. वाढदिवसाच्या निमित्ताने मुलांना फळे व खाऊचे वाटप करण्यात आले. मुलांना केक भरवत गवळी यांनी आपल्या वाढदिवसाचा आनंद द्विगुणित केला. प्रशासकीय अधिकारी म्हणून सामाजिक बांधिलकीचा वसा जोपासणारा हा अनोखा उपक्रम भावनिक करणारा होता. संस्थापिका रामेश्वरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. संस्थेच्या स्थापनेपासून गटशिक्षणाधिकारी येथे येऊन वाढदिवस साजरा करण्याचा हा आजचा पहिलाच प्रसंग आहे, असे जाधव यांनी आवर्जून सांगितले. यावेळी झालेल्या कार्यक्रमासाठी बारामती तालुक्यातील शिक्षकवृंद उपस्थित होते.